## आघाडीचे दोन उमेदवार विजयी

**मुंबई :** विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीचे सर्व ९ उमेदवार निवडून आले आहेत. महाविकास आघाडीचे दोन उमेदवार विजयी झाले आहेत. विधानपरिषद निवडणुकीत विजयी होण्यासाठी २३ मतांचा कोटा होता. चार वाजता एकूण २७४ आमदारांचे मतदान पूर्ण झाले. यानंतर निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन मतमोजणीला सुरुवात झाली. भाजपच्या अमित गोरखे यांच्या मतपत्रिकेवर इंग्रजी आकडा चुकीच्या पद्धतीने लिहिल्यामुळे वाद निर्माण झाला, तर आणखी एका मतपत्रिकेवर दोन उमेदवारांना पहिल्याच पसंतीचे मत दिल्याने ते मत बाद ठरले.

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १३ जुलै २०२४
किंमत ४ ₹




# बहीण सरकारची, दमछाक प्रशासनाची

**योजनेच्या पूर्ततेपेक्षा सत्तेच्या स्वप्नपूर्तीकडे सरकारचे लक्ष**

**निवडणुका समोर ठेवून जाहीर केली योजना**

आविष्कार देसाई

। रायगड ।

विधानसभा निवडणुकीच्या काही महिने आधी शिंदे सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना लागू केली आहे. मध्यप्रदेशमध्ये अशा योजनेमुळे तेथे शिवराज सिंह यांचे सरकार आले. त्यामुळे महाराष्ट्रात माझी लाडकी बहीण या योजनेच्या माध्यमातून महायुतीला पुन्हा सत्तेची स्वप्न पडत आहेत. या स्वप्नपूर्तीसाठी त्यांनी राज्यातील प्रशासनाला या कामाला जुंपले आहे. जिल्हा प्रशासनावर या योजनेमुळे कमालीचा ताण आलेला आहे. मात्र कोणताच अधिकारी ते दाखवण्यास तयार नसल्याचे चित्र दिसत आहे.



लोकसभा निवडणुकीत महायुतीला सपाटून मार खावा लागला. महाविकास आघाडीने लोकसभेच्या निवडणूकीत सर्वाधिक ३१ जागा जिंकल्या आहेत. राज्यात फोडा-फोडीचे राजकारण केल्याने भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची पत घसरल्यानेच त्यांना पराभवाचा सामना करावा लागला हे काही लपून राहिलेले नाही. जनतेमधून पर्यायाने मतदारांमधून गेलेली पत मिळविण्यासाठी सरकार विविध योजनांच्या माध्यमातून मतदारांना चुचकारण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप विरोधकांनी सुरुवातीपासूनच केला आहे.

विधानसभेच्या निवडणुका सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात लागण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. विधानसभेच्या निवडणुकीबाबत आतापासूनच रणनिती आखण्यास सुरुवात केली आहे. विरोधक चांगलेच ▸ पान २ वर

**जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश**

**राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी, आर्थिक स्वातंत्र्य, त्यांचे आरोग्य, पोषणात सुधारणेसाठी आणि बळकटीकरणासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'ही महत्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. ही योजना ऐतिहासिक योजना असून या योजनेची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.**

# काल्यात खून

## दोन आरोपींना अटक

। अलिबाग । प्रतिनिधी ।

उसने घेतलेले पैसे परत दिले नाही. त्याचा राग धरून आरोपीने कार्ले येथील एका इसमाला बेदम मारहाण केली. त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात मारेकऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक केली आहे.



गिरीष कृष्णा पाटील (४४) असे या मृत व्यक्तीचे नाव आहे. हा इसम कार्ले येथील रहिवासी आहे. त्यांनी पोयनाड येथील राजश्री जयस्वाल यांच्याकडून वीस हजार रुपये उसने पैसे घेतले होते.ही रक्कम परत दिली नसल्याचा राग धरून जयस्वाल यांच्यासह चौघेजण २९ जून रोजी सायंकाळी पाटील यांच्या घरात घुसले. त्यावेळी झालेल्या वादात आरोपींनी गिरीश पाटील यांना बेदम मारहाण केली.

त्यानंतर गावातील पाटील आळीत जाणाऱ्या रस्त्यावर पुलाच्या बाजूला सदानंद पाटील यांच्या घरासमोर आणून पाटील यांच्या डोक्यावर विटेने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. यामध्ये गिरीश पाटील यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी आरोपी जयश्री जयस्वाल, योगेश मोहटे, योगेश सहाणी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक केली आहे. या गुन्ह्यात एका अल्पवयीन मुलाचादेखील सहभाग असल्याची माहिती समोर येत आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक किशोर साळे करीत आहेत.

**आजचा अग्रलेख**

**जिकडे-तिकडे कीड**

**वे|ध|क**

## त्रिशूली नदीत दोन बस बुडाल्या

**नेपाळ :** नेपाळमधील चितवन परिसरात भूस्खलनानंतर दोन बस त्रिशूली नदीत वाहून गेल्याने सात भारतीय नागरिकांसह किमान ६५ लोक बेपत्ता आहेत. काठमांडूहून निघालेली एंजल बस आणि गौरकडे जाणारी गणपती डिलक्स बसचा शुक्रवारी पहाटे अपघात झाला. नारायणघाट-मुगलिंग रस्त्यालगत सिमलताल परिसरात दरड कोसळल्याने प्रवाशांसह दोन्ही बस नदीत वाहून गेल्या. एंजेल बसमध्ये २४ तर गणपती डिलक्समध्ये ४१ जण होते, असे पोलिसांनी सांगितले. गौरकडे जाणाऱ्या बसमधील तीन प्रवासी वाहनातून उडी मारून पळून जाण्यात यशस्वी झाले, असे अहवालात म्हटले आहे. चितवनचे मुख्य जिल्हा अधिकारी इंद्रदेव यादव यांनी सांगितले की, बचावकार्य सुरू असून, भूस्खलनाचा ढिगारा हटवला जात आहे.

# सेझच्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्यासाठी प्रयत्नशील

## शरद पवार यांचे आश्वासन

। उरण । वार्ताहर ।

विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित झालेल्या जमिनी परत मिळण्याची शेतकऱ्यांची आशा पल्लवित झाली आहे. उरण, पेण आणि पनवेल या तालुक्यांमधील शेतकऱ्यांचा शासन दरबारी प्रलंबित असणारा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी पुढाकार घेतला आहे. सेझग्रस्त शेतकरी चळवळ संघटनेच्या शिष्टमंडळाने शरद पवार यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली.



शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाबरोबर झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर शासन दरबारी शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन शरद पवार यांनी दिले आहे.

यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे उरण, पेण, पनवेल तालुक्यातील मे. मुंबई इंटीग्रेटेड एसईझेड लि. या कंपनीला मुंबई कुळवहिवाट आणि शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ६३/१अ अनुसार विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) ▸ पान २ वर

# चौल बायपासला झाड कोसळले

। अलिबाग । प्रतिनिधी ।

चौल बायपास रस्त्यावरील झाड शुक्रवारी सकाळी उन्मळून पडले. त्याठिकाणी कोणीही नसल्याने सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. मात्र वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला होता. मात्र स्थानिकांच्या मदतीने झाडांच्या फांद्या तोडून रस्ता वाहतुकीला मोकळा करण्यात आला.

रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाने जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे. गुरुवारी रात्री पासून सुरू असलेल्या पावसामुळे चौल बायपास येथील भले मोठे झाड रस्त्यातच कोसळले.



त्यामुळे या मार्गावरील वाहतूक अन्य मार्गावरून वळविण्यात आली असून झाडाच्या फांद्या तोडून रस्ता मोकळा करण्याचे काम स्थानिकांच्या मदतीने करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ▸ पान २ वर

# केजरीवालांना अंतरिम जामीन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

दिल्ली मद्यधोरण घोटाळ्यामध्ये ईडीकडून सुरु असलेल्या कारवाईमध्ये दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कोर्टाने त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला आहे. तर त्यांच्या अटकेला आव्हान देणारी याचिका मोठ्या खंडपीठाकडे पाठवण्यात आली आहे. केजरीवालांना सध्या अंतरिम जामीन मिळालेला असला तरी ते जेलमधून बाहेर येऊ शकणार नाहीत. परंतु पाच दिवसांनंतर म्हणजे १७ जुलै रोजी हायकोर्टात होणाऱ्या सुनावणीच्या आधी त्यांना दिलासा मिळाला आहे.




सुप्रीम कोर्टाने म्हटलं की, अरविंद केजरीवाल हे ९० दिवसांपेक्षा जास्त वेळेपासून जेलमध्ये आहेत. ते एक नवनिर्वाचित नेते आहेत आणि त्यांना पदावर रहायचं आहे की नाही. हे त्यांच्यावर अवलंबून आहे. केजरीवालांचे वकील ▸ पान २ वर

# माथेरानमधील धबधब्यावर गर्दी

। नेरळ। प्रतिनिधी ।

ब्रिटिश काळात बांधण्यात आलेले शार्लोट लेक पाण्याने भरले आहे. हा तलाव ओव्हर फ्लो झाल्याने माथेरानकरांची पाण्याची चिंता मिटली आहे. माथेरानमध्ये पर्यटनासाठी आलेले पर्यटक शार्लोट लेक येथे गर्दी करू लागले आहेत.

माथेरानमध्ये आलेल्या पर्यटकांना ओलेचिंब होण्यासाठी आणखी एक हक्काचे ठिकाण निर्माण झाले असून सध्या या धबधब्यावर पर्यटकांची मोठी



गर्दी दिसून येत आहे. ब्रिटिशांनी माथेरानचा शोध लावला आणि त्यानंतर तेथील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी शार्लोट लेक तलाव खोदला.

त्या तलावाची पाणी साठवण क्षमता ही १२८ दशलक्ष लिटर पाण्याची आहे. ▸ पान २ वर

# उत्तर प्रदेशात विजेचा कहर

। लखनौ/प्रतापगड । वृत्तसंस्था ।

उत्तर प्रदेशात वीज पडून झालेल्या विविध दुर्घटनेत ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. यात प्रतापगड येथे सर्वाधिक ११, सुलतानपूर येथे सात, चंदौली येथे सहा, मैनपुरी येथे पाच, प्रयागराज येथे चार, औररिया, हाथरस, वाराणसी आणि सिद्धार्थनगर येथे प्रत्येकी एका जणांचा मृत्यू झाला. तसेच दहा ते बारा जण जखमी झाले.

उत्तर प्रदेशात वीज कोसळून झालेल्या घटनांत किमान ३८ जणांचा मृत्यू झाला आहे. सध्या उत्तर प्रदेशातील अनेक भागात मुसळधार पाऊस पडत आहे. अनेक ठिकाणी पूरस्थिती असून जनजीवन ठप्प झाले आहे.

प्रतापगड जिल्ह्यात वीज पडल्याने अकरा जणांचा मृत्यू झाला. तसेच चंदोली येथे वीज कोसळल्याने अनेक जण जखमी देखील झाले. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काल सायंकाळी चार ते सहा या काळात प्रचंड पाऊस झाला आणि वीज कोसळण्याच्या ▸ पान २ वर

# चित्रलेखा पाटील यांनी केली चिकणी पुलाची पाहणी



● (छायाचित्र : अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुसळधार पावसात मुरूड तालुक्यातील मुख्य रस्त्यावरील चिकणी पुल खचला. मुख्य रस्त्यावरील या पूलाला भगदाड पडून नाल्यावरील पुलाचा भागही वाहून गेला. त्यामुळे अलिबाग-मुरूड मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भितीचे वातावरण तयार झाले होते.

शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील ऊर्फ चिऊताई यांनी मुरुड तालुक्यातील मुख्य रस्त्यावरील चिकणी पुलाची पाहणी केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता रमेश गोरे यांची भेट घेऊन पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करा. तसेच कार्यकारी अभियंता सुखदेवे यांना फोनवर संपर्क साधून तालुक्यातील सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. मुख्य रस्त्यावरील मुरूड ते अलिबाग आणि अलिबाग ते रोह्याच्या मुख्य रस्त्यावरील छोट्या-छोट्या पूलांची (मोऱ्या) संरक्षक कठडे पडझड झाली आहे. मोठा अपघात होऊन अनर्थ घडू नये, या करिता तातडीने त्याचे काम सुरू करावे, तसेच बहुतांशी रस्त्याला खड्डे पडलेले असून रस्त्याच्या साईडपट्ट्या खचल्या आहेत. त्याचे सुद्धा लवकरात लवकर काम मार्गी लावावे, नागरिकांच्या जीवाशी खेळू नये, अशा सूचना चित्रलेखा पाटील यांनी दिल्या. ▸ पान २ वर



# अतिवृष्टीमुळे रस्ता गेला वाहून



**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मरूड तालुक्यातील मजगाव ग्रामपंचायत हद्दीतील आरावघरसह पाच गावांना जोडणारी रस्त्यावरील मोरी अतिवृष्टीत पुराच्या जोरदार प्रवाहामुळे वाहून गेली असून, केवळ दुचाकी जाईल एवढाच रस्ता शिल्लक राहिल्याने ग्रामस्थांची अडचण होत आहे. आरवघर भागाला पाच गावे जोडलेली असून, दुचाकीव्यतिरिक्त चारचाकी वाहन या रस्त्यावरून जाऊ शकत नाही.त्यामुळे शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांचे मोठे हाल होत आहेत.

जलजीवन मिशन अंतर्गत गावाला पाणी देण्यासाठी रस्त्याच्या बाजूला चर खणण्यात आले. परंतु, पाईपलाईन खड्ड्यात बुजवताना ती वरवर मती टाकून बुजविल्यामुळे अतिवृष्टीमुळे सर्व माती वाहून जाऊन मोठ मोठे खड्डे आहेत. दरम्यान, रस्त्याच्या मधून पाणी जाण्यासाठी काँक्रिटचे मोठे पाईपसुद्धा वाहून गेले आहेत.

रस्त्याची मोरीच वाहून गेल्याने रस्ता पोकळ बनला आहे. त्यामुळे येथून चारचाकी वाहन जाणे अशक्य बनले आहे. संबंधित खात्याला

## मजगावसह पाच गावांतील ग्रामस्थांची अडचण

## शेतकरी संघटनेचा रस्ता रोको करण्याचा इशारा

कळवूनसुद्धा लक्ष देत नसल्याने महाराष्ट्र राज्य किसान क्रांती संघटनेचे उपाध्यक्ष श्रीधर जंजीरकर यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी रास्ता रोको करण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत जंजीरकर यांनी सांगितले की, अतिवृष्टी झाल्याने ही मोरी वाहून गेली. त्याचप्रमाणे काही शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसल्याने मोठे नुकसान झाले आहे. कृषी खात्याने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच अरवघर येथील मोरी तातडीने दुरुस्त करून वाहतूक कशी सुरळीत होईल हे प्रशासनाने पाहावे अन्यथा सर्व शेतकरी रस्त्यावर उतरून रास्ता रोको करतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

दरम्यान, मोरी तुटल्याने घानवट, वेळास्ते, पोफळी, वावे व वांद्रे या गावच्या ग्रामस्थांची मोठी अडचण झाली आहे. भातलावणीचा हंगाम असल्याने बैलगाडी, टेम्पो, ऑटो रिक्षा आदी वाहनांतून खते व अन्य वस्तुंची वाहतूक बंद झाली असून, शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे.

कालपर्यंत प्रशासनाचे कोणीही अधिकारी इकडे फिरकले नसल्याने ही मोरी जिल्हा परिषद बांधकाम विभाग कधी दुरुस्त करेल, या विवंचनेत ग्रामस्थ पडले आहेत. मोरीचे काम तातडीने पूर्ण करून वाहतूक पुर्ववत करण्याची मागणी होत आहे.



## कळंबुसरे तलावावर जलपर्णीचे पांघरुण

**। उरण । वार्ताहर ।**

पावसाळा सुरू झाल्याने सृष्टीने हिरवा शालू परिधान केला आहे. त्या धर्तीवरील सौंदर्यात भर घालण्यासाठी कळंबुसरे गावातील तलावात जलपर्णीने पांघरुण घातल्याने चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना सुखद अनुभव मिळत आहे.पावसाळ्यातील निसर्गरम्य परिसराचा तेथील फेसाळणाऱ्या धबधब्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक आपापल्या कुटुंबासह डोंगर भागात जात आहेत.

कळंबुसरे गावातील तलावात जलपर्णीने पावसाळ्यात पांघरुण घातल्याचे चित्र सध्या अनेकांना आपल्या मोह जाळ्यात अडकविण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे चिरनेर कोप्रोली रस्त्यावरून प्रवास करणारे नागरिक तलावात पसरलेल्या जलपर्णीकडे मोठ्या कौतुकाने पाहात आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :- mahad.ee@mahapwd.com ph. No. 20145 222167
**निवीदा सूचना क्रमांक ५ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) | इसारा बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १०५००९७ | राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत मौजे दासगाव ता.महाड येथील दासगाव तलावाचे संवर्धन करणे ता.महाड जि.रायगड | २८९१६२७७.०० | १५००००.०० | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| १०५०१२७ | राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत मौजे टोळ बुद्रुक ता. महाड येथील टोळ तलावाचे संवर्धन करणे ता.महाड जि.रायगड | २७९२३०३०.०० | १५००००.०० | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १५/०७/२०२४ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २२/०७/२०२४ वेळ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा.मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग कोंकण, मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १६/०७/२०२४ वेळ १२.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, रायगड (सा.बां.)मंडळ कोंकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २४.०७.२०२४ वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३२२७
दिनांक :- ११-०७-२०२४

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


## न.प. कर्मचाऱ्यांचे एकदिवसीय आंदोलन

**आगरदांडा :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत राज्याचे मुख्य सचिव, वित्त विभाग सचिव, सामाजिक न्याय विभागाचे सचिव आणि नगरविकास विभागाचे सचिव यांच्या उपस्थितीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीमध्ये झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी एक वर्ष आणि तीन महिने होऊनही झालेली नाही, याकडे प्रामुख्याने लक्ष वेधण्यासाठी कोकण भवन विभागीय आयुक्त कार्यालय व नगरपालिका प्रशासन संचालनालय कार्यालय येथे महाराष्ट्र राज्य नगरपरिषद आणि नगरपंचायत संवर्ग संघर्ष समितीच्या वतीने नगरपालिका प्रशासन संचालनालय अधिकारी मनोज रानडे यांच्याकडे निवेदन देऊन एकदिवसीय उपोषण व आंदोलन करण्यात आले.

# नेरळ गावातील रस्त्यावर धुळीचे साम्राज्य

## ● रस्त्यावरील डांबर निघाल्याने अपघात होण्याची दाट शक्यता

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कल्याण कर्जत राज्यमार्ग रस्त्यावर जून महिन्यात करण्यात आलेले डांबरीकरण नेरळ गावात नित्कृष्ट दर्जाचे झाले होते. रस्त्यावरील डांबर वाहून गेल्याने डांबरीकरणासाठी टाकण्यात आलेली ग्रीड वाहनचालकांसाठी धोक्याची बनली आहे. दरम्यान, राज्यमार्गावर नेरळ गावाच्या हद्दीतील रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले असून दुचाकीचालक हे रस्त्यावर गाड्या घसरून पडत आहेत.

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर शेलू पासून वडवली गावापर्यंत रस्त्यावर डांबरीकरण मे अखेर पासून जूनच्या पहिल्या आठवड्यात करण्यात आले होते.



पी.पी. खारपाटील कंपनीकडे कर्जत कल्याण रस्त्यावरील कर्जत तालुका हद्दीची जबाबदारी शासनाने दहा वर्षासाठी दिली आहे. त्यामुळे पावसाळा सुरु होण्याअगोदर रस्त्यावर डांबरीकरण करून रस्ता सुस्थितीत करण्याचा प्रयत्न ठेकेदाराने केला.

मात्र नेरळ गावातील खांडा पासून हुतात्मा चौक फॉरेस्ट चौकीपर्यंत रस्त्यावर टाकलेले डांबर हे निकृष्ट दर्जाचे टाकले होते. त्यामुळे पावसाळा सुरु झाल्यानंतर रस्त्यावर टाकलेले डांबर निघून जाऊ लागले आणि बैलगाडीच्या चाकासारख्या रेषा राज्यमार्गावर पडल्या आहेत. त्यामुळे प्रामुख्याने दुचाकी चालक यांची अशा रस्त्याने गाडी चालवताना भंबेरी उडत आहे.

रस्त्यावर डांबरीकरणासाठी वापरलेली ग्रीड हि सर्वत्र आढळून येत आहे. त्या ग्रीडमुळे रस्त्यावर वाहनांच्या वर्दळीची प्रचंड धूळ उडत आहे. दुचाकीस्वार त्या ग्रीडवरून घसरून पडत आहेत.

सार्वजनिक बांधकाम खात्याने पावसाचा कमी झालेला जोर लक्षात घेऊन नेरळ गावातील खांडा ते हुतात्मा चौक या भागात रस्त्यावर पुन्हा डांबरीकरण करून घ्यावे अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ मनोहर हजारे यांनी केली आहे. किशोर भोईर यांनी रस्त्यावर ती ग्रीड बाजूला करण्याचे काम करून घ्यावे आणि वाहनचालक यांचे अपघात टाळावेत अशी मागणी केली आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड- ४०२ २०१**
ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६
**ई-निविदा सूचना क्र. १ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचेकडून)/नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रूपये |
|---|---|---|
| १) | रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील प्रस्तावित जिल्हाधिकारी कार्यालयाचा अतिरिक्त दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे. | १,८०,०६,५१४/- |
| २) | अलिबाग तालुक्यातील चौल वावे बेलोशी रस्ता प्रजिमा- ३०कि.मी.१/५०० ते ७/८०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे जि. रायगड | २,४९,७१,१४३/- |
| ३) | अलिबाग तालुक्यातील पेझारी कोळघर बेलकडे भादाने नागाव ते बेलकडे रस्त्याचे मजबुतीकरण करणे रामा-१० कि.मी. १६/०० ते २२/०० (भाग वेलवली ते नागाव) जि. रायगड | २,४९,९८,९९५/- |
| ४) | अलिबाग तालुक्यातील रा.मा. ८७ ते रूईशेत भोपोली मार्ग ग्रा.मा. ११६ कि.मी. ०/०० ते ००/०० ते ४/०० पोहोचमार्ग व संरक्षण भिंतीसहीत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे जि. रायगड | ३,४१,३२,७१२/- |
| ५) | अलिबाग तालुक्यातील रा.मा. ८७ ते वेश्वी वाडगाव मार्ग इजिमा-७३ कि.मी. ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे जि. रायगड | १,२३,७४,५६८/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १५/०७/२०२४ (स. १०.००) ते दिनांक २२/०७/२०२४ (सं. १८.००)
निविदापूर्व बैठक :- अ.क्र. ४ मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि. १६/०७/२०२४ रोजी दु. ३.०० वाजता
निविदापूर्व बैठक :- अ.क्र. १ ते ३ मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे दालनात दि. १६/०७/२०२४ रोजी दु. ११.०० वाजता
ई-निविदा उघडणे :- दिनांक २५/०७/२०२४ (दु. ३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/३६४३/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग-४०२ २०१
दिनांक :- ०८/०७/२०२४

सही/-
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, अलिबाग
जि. रायगड


पान १ वरून

## बहीण सरकारची, दमछाक प्रशासनाची

आक्रमक असल्याचे पावसाळी अधिवेशात दिसून आले. महायुतीचे सरकार जनतेसाठी काहीच करत नाही. हे पुराव्यानिशी त्यांनी सिद्ध केले. विरोधकांचे हे हल्ले असेच विधानसभा निवडणुकीपर्यंत सुरुच राहणार आहेत. त्यामुळे विरोधकांना काऊंटर करण्यासाठी शिंदे सरकार विविध योजना आणत आहे. त्यातीलच एक म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना होय. या योजनेमार्फत महिलांना महिना दीड हजार रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेचा राज्यातील सुमारे अडिच कोटी महिलांना फायदा मिळणार असल्याचा दावा सत्ताधारी करत आहेत. हे निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन केल्याचीही चर्चा आहे.

मध्यप्रदेशमध्ये शिवराज सिंह चव्हाण यांनी मेरी लाडली बेहना अशी योजना आणून सत्ता काबीज केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अशीच योजना राबवून सत्ता मिळवण्याचे मनसुबे महायुतीचे असावेत. त्यांच्यासाठी सदरची योजना महत्वाकांशी असल्याने शिंदे सरकारने राज्यातील प्रशासनाला कामाला लावले आहे. याची प्रचिती रायगड जिल्ह्यात दिसून येते.

जिल्हाधिकारी यांनी योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रशासनाने कामाला लागावे, असे निर्देश शुक्रवारी (दि.१२) झालेल्या बैठकीत दिले आहेत. या अधिकच्या कामामुळे दैनंदिन कामे बाजूला राहात असून कामाचा अतिरिक्त ताण वाढला आहे. त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांची चांगलीच दमछाक होत असल्याचे दिसून येते. तसेच प्रशासनाला तोंड दाबुन बुक्क्यांचा मार सहन करावा लागत असल्याचे यावरुन स्पष्ट झाले.

## सेझच्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्यासाठी प्रयत्नशील

स्थापन करण्याकरीता दिलेल्या मे. विकास आयुक्त, (उद्योग) मुंबई यांच्या परवानगी आदेशाचे कलम १ प्रमाणे शेतकऱ्यांना जमीन मिळकती मूळ किंमतीस परत करण्याबाबत सरकारने आदेश दिले होते. परंतु अद्याप पर्यंत त्याची कोणतीही अंमलबजावणी झाली नाही. याबाबत सेझग्रस्त शेतकरी चळवळ संघटनेने सरकार दरबारी वारंवार पाठपुरावा करूनही शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही. म्हणून शेतकऱ्यांच्या प्रमुख शिष्टमंडळाने महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक तथा राष्ट्रीय नेते शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळवून देण्याबाबत आपण सरकार दरबारी प्रयत्न करण्याचे आश्वासित केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र राज्याचे महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, कोकण विभाग युवक अध्यक्ष प्रमोद बागल, गणेश नलावडे, उरण तालुका विधानसभा अध्यक्ष ॲड. दत्तात्रेय नवाले , उरण तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर रघुनाथ घरत, पेण तालुका अध्यक्ष हेमंत म्हात्रे, सचिव आनंद रमेश ठाकूर, उपाध्यक्ष प्रभाकर अनंत मोकल, सचिव रामदास लखु दवई , खजिनदार प्रदीप गजानन मोकल, सुमित ज्ञानेश्वर घरत, रोहित जगदीश ठाकुर, शांताराम चांगू म्हात्रे, रघुनाथ जोमा घरत, गणेश पाटील आदी उपस्थित होते.

## माथेरानमधील धबधब्यावर गर्दी

तर तलावाच्या बाजूला बांधलेल्या बंधाऱ्यामुळे तलावात १४८ दशलक्ष लिटर पाणी साठवता येते. त्यामुळे हा तलाव माथेरान येथील नागरिकांचा पाणी पुरवठा करणारा तलाव समजला जातो. माथेरानमध्ये खोलगट भागात असलेल्या या तलावाच्या चोहोबाजूला मोठ्या प्रमाणात जंगल आहे. त्यामुळे सतत कोसळत असलेल्या पावसामुळे माथेरानमध्ये पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना भिजण्याची आणखी एक संधी मिळाली आहे.

पन्नास फूट खोल असणारा गर्द झाडीत लपून बसलेला हा शार्लोट तलाव सध्या दुथडी भरून वाहत आहे. याच लेकच्या बाजूला पुरातन जागृत स्वयंभू ग्रामदैवत पिसारनाथ मंदिर आहे. पावसाळ्यात एक दिवसीय पर्यटनासाठी माथेरान सध्यातरी एकमेव पर्याय म्हणून जवळचे स्वस्त आणि मस्त पर्यटनस्थळ उपलब्ध आहे. त्याचवेळी सुरक्षित असलेले येथील धबधब्याचे ठिकाण पर्यटनासाठी नवीन डेस्टिनेशन बनले आहे.

## चौल बायपासला झाड कोसळले

चौल बायपास या परिसरात वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे. मुरूड व अलिबागकडे जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची गर्दीदेखील या मार्गावर अधिक असते. शुक्रवारी सकाळी चौल बायपास येथील झाड रस्त्याच्या मधोमतच कोसळले. दोन्ही बाजूकडील वाहतूकीवर त्याचा परिणाम झाला होता. त्यामुळे बायपास ऐवजी रेवदंड्यातून वाहतूक वळविण्यात आली होती.

## उत्तर प्रदेशात विजेचा कहर

घटना घडल्या. यादरम्यान दोन चुलत भाऊ शेतात काम करत असताना त्यांच्या अंगावर वीज कोसळली. यात दोघांचाही मृत्यू झाला.

सुलतानपूर येथील सात मृतांत तीन मुलांचा समावेश आहे. वीज कोसळल्याची घटना घडली. तेव्हा काहीजण धानाची लागवड करत होते. तर काहीजण आंबे तोडणीचे काम करत होते. मात्र वीज पडल्याने एकच कल्लोळ उडाला. तसेच जिल्ह्यात एक महिला झाडाखाली उभी असता तिच्या अंगावर वीज पडली. तिचा जागेवरच मृत्यू झाला. औरिया येथे पावसामुळे आंब्याच्या झाडाखाली थांबलेल्या एका चौदा वर्षाच्या मुलाचा वीजेमुळे मृत्यू झाला. देवरिया येथे शेतात जाणाऱ्या पाच वर्षाच्या मुलाचा वीज कोसळल्याने मृत्यू झाला. वाराणसीत दोन भावांवर वीज कोसळली. यापैकी एकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्यावर उपचार सुरू आहेत. भारतीय हवामान खात्याने येत्या पाच दिवसांत उत्तर प्रदेश आणि अन्य लगतच्या राज्यांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविला आहे.

## केजरीवालांना अंतरिम जामीन

विवेक जैन म्हणाले की, आता प्रकरण मोठ्या बेंचकडे गेलं आहे. पीएमएलए प्रकरणात केजरीवालांना अंतरिम जामीन मिळाला आहे. त्यामुळे जामिनाशी जोडलेलं प्रकरण आता संपलं आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या सर्वोच्च न्यायालयातील खंडपीठाने ईडीच्या अटकेविरोधातील याचिकेला लार्जच बेंचकडे पाठवलं आहे. केवळ चौकशी करुन अटक होऊ शकत नाही, असं कोर्टाने नमूद केलं आहे.

जस्टिस खन्ना म्हणाले की, मूळ अधिकारासंबंधीचं हे प्रकरण आम्ही मोठ्या खंडपीठाकडे पाठवलं आहे. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांना आम्ही जामिनावर मुक्त करण्याचे निर्देश देतो. अंतरिम जामिनाच्या प्रश्नावर खंडपीठाकडून सुधारणा केली जाऊ शकते, असंही कोर्टाने स्पष्ट केलं.

कोर्टाने म्हटलं की, आम्ही जामिनाच्या मुद्दा तपासला नसून पीएमएलएच्या कलम १९च्या पॅरामिटर्सची तपासणी केली. यात अटकेच्या नियमांमध्ये आणखी स्पष्टता आवश्यक आहे. १९ हे अधिकाऱ्यांचे व्यक्तिनिष्ठ मत असले तरी ते न्यायालयाच्या पुनरावलोकनाच्या अधीन आहे. दुसरीकडे सीबीआयने या प्रकरणात दुसरा खटला दाखल केला आहे. त्यावर १७ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. तिथेही केजरीवालांना जामीन मिळेल, असं त्यांच्या वकिलांनी सांगितलं.

## चित्रलेखा पाटील यांनी केली चिकणी पुलाची पाहणी

चिकणी पुलाच्या खचलेल्या भागाच्या कामाची सुरुवात करण्यात आली असून लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्यात येत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते तुकाराम पाटील, सरोज दिवेकर, रमेश दिवेकर, रिझावन फहीम, विक्रांत वार्डे, राहिल कडू व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## महापालिकेवर मनसेचा मोर्चा

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

महानगर गॅस कंपनीकडून गॅस वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते योग्यरितीने दुरुस्त करण्यात आलेले नसल्याने अपघात होत असल्याचा आरोप करत खोदकाम करण्यात आलेले रस्ते योग्यरितीने दुरुस्त करावेत, या मागणीसाठी पनवेल शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पालिका मुख्यालयाबाहेर अनोखे आंदोलन करण्यात आले.

पनवेल मनसेचे शहर अध्यक्ष योगेश चिले यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात मनसेचे कार्यकर्ते हातावर आणि डोक्यावर अपघातानंतर अपघातग्रस्तांच्या जखमांवर डॉक्टर ज्या प्रमाणे मलमपट्टी करतात, त्याप्रमाणे मलमपट्टी करुरु सामील झाले होते. यावेळी पालिकेच्या मुख्यालयाबाहेर तैनात असलेल्या पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना कार्यालयात जाण्यास मज्जाव केला.


**रायगड जिल्ह्यातील एकमेव शासन मान्यताप्राप्त नर्सिंग मधील पदवी महाविद्यालय : डॉ. माळी**

महाड:- ए. एन. एम. (ANM), . एन. एम. (GNM) व बी. एस्सी नर्सिंग (B. Sc Nursing) हे अभ्यासक्रम १०० टक्के रोजगार देणारे आहेत. या अभ्यासक्रमांना आर्थिक दुर्बल घटकतील विद्यार्थी अधिक प्रमाणात प्रवेश घेत असतात. तसेच या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणारे विद्यार्थी गरीब आणि शेतकरी कुटुंबातील असतात त्यामुळे त्यांना या अभ्यासक्रमांची फी भरणे शक्य नसल्याने रोजगार देणाऱ्या अभ्यासक्रमपासून वंचित राहावे लागते. परंतु आता नर्सिंग अभ्यासक्रमांसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या घटकांतील विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व परीक्षा शुल्क, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता यांकरिता महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे.

या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे तसेच या शिष्यवृत्तीच्या मदतीमुळे ग्रामीण भागातील सर्व गरजू विद्यार्थ्यांना नर्सिंग करिअरमध्ये भवितव्य घडवण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्था ही एक रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ट संस्था आहे. तसेच नर्सिंग क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत म्हणून आवडीनुसार करिअर निवडा असे आवाहन संस्थेचे सचिव डॉ. रामलिंग माळी यांनी केले आहे.

सध्याचे वातावरण आणि रोगराईचे प्रमाण पाहता या क्षेत्रात प्रचंड मोठ्या संधी आहे. करोना काळात या सगळ्याचे महत्व आपण जाणलेच. त्यामुळे नर्सिंग हे अनेक मोठ्या संधींनी भरलेले क्षेत्र आहे. ज्यामध्ये सरकारी, निम सरकारी किंवा खासगी रुग्णालये, नर्सिंग होम यामध्ये तुम्ही नोकरी करू शकता. याशिवाय सरकारी आस्थापना, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, आरोग्य गृह अशा ठिकाणीही परिचर आणि परिचारिका यांना उत्तम संधी असते. सध्या या क्षेत्रात वेतनही भरपूर दिले जात आहे. एवढेच नव्हे तर परदेशातही संधी उपलब्ध आहेत.

राष्ट्रीय आरोग्य न्याय संशोधन संस्थेचे रायगड इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन मुरुड-जंजिरा हे रायगडमधील एकमेव नर्सिंग मधील पदवी महाविद्यालय आहे व या महाविद्यालयामध्ये मध्ये जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे व बी. एस्सी नर्सिंग (B. Sc Nursing) ०४ वर्षे असे दोन्ही शासन मान्यताप्राप्त अभ्यासक्रम सुरू आहेत. तसेच या संस्थेचे नूतन स्कूल ऑफ नर्सिंग नांदगाव येथे महाविद्यालय असून येथे ए. एन. एम. (ANM) ०२ वर्षे व जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे हे दोन्ही अभ्यासक्रम सुरू आहेत. त्याचप्रमाणे ओम कॉलेज ऑफ नर्सिंग महाड येथे जी. एन. एम. (GNM) ३ वर्षे हा अभ्यासक्रम सुरू आहे. सदर अभ्यासक्रमाला शासन शिष्यवृत्ती देत असल्यामुळे मोफत प्रवेशाची संधी आहे. त्याचप्रमाणे नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचे किमान वय १७ वर्षे असावे तर कमाल वयाची अट नाही.

नर्सिंग अभ्यासक्रम हे आरोग्यसेवा व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि त्याची कायदेशीर चौकट ही व्यवसायाला आकार देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु काही बनावट नर्सिंग कोर्सेस आणि प्रमाणपत्रे देणाऱ्या अनधिकृत संस्थां रायगड व महाराष्ट्रामध्ये आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात येते. या बनावट नर्सिंग संस्था अपरिचित किंवा मान्यता नसलेले अभ्यासक्रम, अयोग्य प्राध्यापक, पायाभूत सुविधा आणि उपकरणांचा अभाव, अत्याधिक शुल्क व प्लेसमेंट आणि परवाना देण्याची खोटी आश्वासने देऊन विद्यार्थ्यांची फसवणूक करत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रवेश घेत असताना शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्येच प्रवेश घ्या असा महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यकीय मंडळ मुंबईने विद्यार्थी आणि पालकांना राज्यात कार्यरत असलेल्या फसव्या नर्सिंग संस्थांपासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे.

नर्सिंग क्षेत्रामध्ये भवितव्य घडविण्यासाठी आजच आपला प्रवेश शासन मान्यताप्राप्त संस्थेमध्ये खाली दिलेल्या नंबरवर फोन करून निश्चित करा.
**रायगड इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन**, मुरुड-जंजिरा, अलिबाग, रायगड ४०२ ४०१, मो. ९९२०२६१०१७, ९८१९०७११९८, ७७७४८५०५४५.
Website: - raigadine.co.in Email ID: - raigadine@gmail.com Instagram/Facebook ID: - rinebsc.nursing
ADVT

**निवडक**

## राष्ट्रीय एकात्मता गौरव सोहळा

**रसायनी :** समृध्दी पब्लिकेशन व सम्यक सामाजिक संस्था आयोजित गुरुपोर्णिमेनिमित्त राष्ट्रीय एकात्मता गौरव संमेलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात महाराष्ट्रातील महनीय व्यक्तींचा व संस्थांचा विलोभनीय सन्मान होणार आहे. या कार्यक्रमाला अभिनेता मिलिंद गवळी, मेघराज राजेभोसले, जाकीर खाण आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे. हा सन्मान सोहळा रविवारी (दि.२१) सकाळी १० वाजता ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालयात होणार आहे.

## मोबाईल मूळ मालकांना परत

**पनवेल :** १३ लाख ५० रुपयांचे ८२ चोरी आणि गहाळ झालेले मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. खारघर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमांत संबंधित मोबाईल परत करण्यात आले. आणखी ८०० मोबाईल ट्रेस करण्यात आले असून लवकरच मोबाईल हस्तगत करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कामगिरीसाठी खारघर पोलिसांचे वरिष्ठांकडून कौतुक करण्यात आले आहे.

## खांडपे येथे अन्नसुरक्षा अभियान

**नेरळ :** कर्जत तालुका कृषी विभागाच्यावतीने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान राबविण्यात आले. येथील खांडपे आणि कुंडलज या गावातील शेतकऱ्यांच्या शेतावर हे अभियान राबविण्यात आले. कुंडलज येथील रोहिदास चंचे व खांडपे येथील साधुराम पाटील यांच्या ४० गुंठे जमिनीवर भाताची लागवड करण्यासाठी कृषी अधिकारी जमले होते. या शेतात कर्जत ९ या वाणाचे राब तयार करण्यात आले होते. शेतात रोप तयार झाल्यावर चारसूत्री पद्धतीने भाताची लागवड करण्यासाठी कृषी अधिकारी कर्मचारी शेतात उतरले होते.

## शाळेत नावीन्यपूर्ण उपक्रम

**उरण :** राजिप केंद्र शाळा नवीन शेवा येथे दि.१ ते ८ पर्यंत वेगवेगळ्या रंगछटेवर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. पर्यावरण पूरक या उपक्रमात पहिल्या दिवशी आरोग्यदायी जीवन शैली स्वीकारणे या रंगछटेवर आधारित वृक्षारोपण हे उपक्रम राबविण्यात आले. तसेच, दुसऱ्या दिवशी शाश्वत अन्नप्रक्रिया स्वीकारणे या उपक्रम ंतर्गत भरड धान्य स्पर्धा व परसबाग तयार करणे हा उपक्रम राबविण्यात आला. तिसऱ्या दिवशी ई-कचरा कमी करणे या उपक्रमाअंतर्गत ई-कचऱ्याचा पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाची माहिती मुख्याध्यापकांनी दिली.

## रस्त्यावर वाहतूक कोंडी

**रसायनी :** दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा ते रिस या रहदारीच्या रस्त्यावर ठिकठिकाणी कॉक्रीटीकरणाचे काम सुरु असल्याने वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे सकाळी शाळा, ऑफिसला जाणाऱ्या नागरिकांना अडकून पडावे लागत आहे. तासनतास होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहतूक पोलिसांनाही डोकेदुखी झाली आहे. तसेच, एखादा अपघात झाल्यास जखमींना नवी मुंबई हॉस्पिटलात घेऊन जात असताना रुग्ण दगावल्यास जबाबदार कोण, असा सवाल नागरिकांतून केला जात आहे.

# पोलादपूर नगरपंचायतीची अशीही ‘रथसप्तमी’

**।पोलादपूर । शैलेश पालकर ।**

**पोलादपूर तालुक्याची ग्रामपंचायत असताना ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रूपांतर झाल्याचा ऐतिहासिक ठराव एकमताने मंजूर झाल्याच्या घटनेला १३ जुलै रोजी १० वर्षे पूर्ण होत असताना नगरपंचायतीच्या कारभारात आकृतीबंधाच्या मंजूरीअभावी कर्मचारी भरती थंडावली आहे. गेल्या ७ वर्षांमध्ये ७ वाहने प्राप्त झाली असून ग्रामपंचायत काळापासून सेवेत असलेला एकच चालक या सर्व सात वाहनांचा एकमेव सारथी असल्याची टीका विरोधीगटाकडून नगरसेवक दिलीप भागवत आणि स्वप्नील भुवड यांनी केली आहे.**

पोलादपूर ग्रामपंचायतीच्या विशेष सभेमध्ये नगरपंचायतीचा ठराव १३ जुलै २०१४ रोजी मंजूर झाल्यानंतर तहसिलदार नाडेकर यांना प्रशासक म्हणून संधी मिळाली आणि एक वर्षांने २०१५ रोजी नगरपंचायतीमध्ये निवडणुकीनंतर लोकनियुक्त सत्ता स्थापन झाली. यानंतर एक टर्म पूर्ण होऊन पुन्हा दुसरी टर्मदेखील शिवसेनेलाच सत्तास्थापनेसाठी मिळाली आहे. पहिल्या टर्ममध्ये काँग्रेसला विरोधी पक्षामध्ये बसण्याची संधी मिळाली तर दुसऱ्या टर्ममध्ये सत्ताधारी शिवसेना नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला आणि विरोधी गटात बसलेल्या काँग्रेस नगरसेवकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये प्रवेश केल्यानंतर नगरपंचायतीमध्ये शिवसेना विरूध्द शिवसेना अशी परिस्थिती दिसून येत आहे. मात्र, सत्ताधारी आणि विरोधी गटाच्या नगरसेवकांमधील नोकझोंक पोलादपूरच्या जनतेने नेहमीच अनुभवली आहे.

अलिकडेच नगरपंचायतीकडे नवीन वाहने वर्ग करण्यात आल्यानंतर विरोधी पक्षाचे गटनेते नगरसेवक दिलीप भागवत आणि स्वप्नील भुवड आक्रमक झाल्याचे दिसून आले. नगरपंचायतीच्या सात वर्षांमध्ये ४ घंटागाड्या, २ डम्पर, १ ट्रॅक्टर अशी ७ वर्षांमध्ये ७ वाहने स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्राप्त झाल्याची माहिती देताना दिलीप घाटे हा एकमेव चालक सात वाहनांचा सारथी म्हणून ग्रामपंचायत काळापासून सेवेत असल्याचे सांगितले. आणि त्या एकमेव चालकाचे आकृतीबंध मंजूरीअभावी समावेशन झाले नसल्याची माहिती यावेळी देण्यात आली. सत्ताधाऱ्यांना विरोध करण्यासाठी नव्हे तर नगरपंचायतीला एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करताना नगरपंचायतीची अनेक वर्षांपासूनची अग्निशमन बंबाची मागणी दूर्लक्षित राहिल्याने ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्याच्या हेतूने हा विषय प्रसिध्दी माध्यमांकडे मांडत असल्याचे यावेळी नगरसेवक दिलीप भागवत आणि स्वप्नील भुवड यांनी सांगितले.

**■ सात वाहनांना एकच चालक सारथी; आकृतीबंध मंजूरीअभावी कर्मचारी भरती नाही**

### कर्मचाऱ्यांपेक्षा नगरसेवक व स्वीकृत नगरसेवकच अधिक

**पोलादपूर नगरपंचायतीमध्ये नगरअभियंता हे पद रिक्त असल्याने पोलादपूर नगरपंचायत बांधकाम परवानगी देणे व इतर बांधकामविषयक कामकाजाला खीळ बसली आहे. लिपिक टंकलेखक मंजूर ५ पदांपैकी ४ पदे रिक्त असल्याने बांधकाम विभाग, करविभाग, लेखाविभाग, आरोग्यविभाग आणि नळपाणीपुरवठा विभाग या विभागांची जबाबदारी एकाच लिपिकावर येत असून संबंधित विभागांच्या कामकाजातील समस्या वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलादपूर नगरपंचायतीमध्ये आकृतीबंधानुसार १९ कर्मचारी असण्याची गरज स्पष्ट झाली आहे. यापैकी तीन कर्मचारी लिपिक रूपेश जाधव, शिपाई प्रमोद शिंदे आणि व्हॉल्वमन यशवंत मोरे यांचे पोलादपूर नगरपंचायतीमध्ये समावेशन करण्यात आले आहे. पोलादपूर ग्रामपंचायतीचे जुने अनुभवी कर्मचारी लिपिक गणपत मोरे हे समावेशनाच्या प्रतिक्षेत सेवानिवृत्त झाले असून उर्वरित ८ कर्मचाऱ्यांचे समावेशन झाले नाही. यामुळे १७ नगरसेवक आणि २ स्विकृत नगरसेवक अशा १९ नगरसेवकांची संख्या असलेल्या पोलादपूर नगरपंचायतीमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या मात्र अत्यल्प असल्याने नगरपंचायतीचा गाडा कसा चालवायचा, असा प्रश्न प्रशासनाला भेडसावत आहे.**



या पोलादपूर नगरपंचायतीमध्ये राज्यस्तरिय संवर्गातील १९ मंजूर पदांपैकी केवळ ७ पदे भरली गेली आहेत. यात ५० टक्केपेक्षा कमी कर्मचारीवर्ग असताना नगरपंचायतीच्या विकासाचं गाडं चालविण्याची जबाबदारी पोलादपूरचे प्रभारी मुख्याधिकारी विराज लबडे यांनी गेल्या वर्षभरात अधूनमधून हजर होत समर्थपणे पेलली आहे. आकृतीबंध मंजूरीअभावी कर्मचारी भरती शक्य नसल्याची माहिती विराज लबडे यांनी बोलताना दिली. वाहनांची खरेदी राज्यपातळीवरून होत असून नगरपंचायतीच्या आर्थिक बाजूतून परस्पर देयके अदा होत असल्याने ही वाहने स्विकारण्याची अपरिहार्यता असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. अग्निशमन बंबासाठी आपण शासनाकडे प्रस्ताव केला असून तो मंजूरीच्या प्रतिक्षेत असल्याचेही यावेळी मुख्याधिकारी लबडे यांनी सांगितले.

परिणामी, पोलादपूर नगरपंचायतीच्या सात वाहनांना सात सारथी मिळण्याची शक्यता येत्या काही वर्षांमध्ये धूसर दिसून येत आहे.



● वारीमधील तुकोबारायाचे अकलूज येथील माने विद्यालयातील झालेले भव्य रिंगण. या रिंगणामध्ये देवाचा अश्व धावत असताना लाखो वारकरी विठ्ठलाच्या भक्तित लीन झाले होते. (छायाचित्र-शंतनू नाझरे)

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

श्रीमती इन्दुमती वसंतलाल शहा चॅरिटेबल ट्रस्ट बोरिवली यांच्या मार्फत विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. यामध्ये गो शाळा चालवणे, वैद्यकीय उपचारासाठी मदत करणे, मुलांना उच दर्जाचे शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत करणे, वृक्षारोपण आदी विविध उपक्रम राबवले जातात. यंदा दरवर्षी प्रमाणे पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यामंदिरातील इयत्ता पाचवी ते दहावी मधील शालेय विद्यार्थ्यांना टी-शर्ट, टोपी, तसेच वह्या, पेन, पेन्सिल व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. ट्रस्टकडून साहित्य विद्यालयास मिळवून देण्याकरिता ट्रस्टचे समन्वयक गणेशजी सावंत व रसिका पवार यांचे मोलाचे योगदान लाभले. यावेळी निलेश थोरे, अमोल पवार, रितेश मुंढे, शाळेचे चे रमन खेळू वाजे, सचिव संजय रेडीज, परेश चांगले, स्वप्नील साळवी, राकेश जाधव, सुयोग बारटक्के, मुख्याध्यापक संतोष रेडीज आदी मान्यवर उपस्थित होते.

# वडगाव प्राथमिक शाळेस माध्यमिक शाळेचा दर्जा

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव जिल्हा परिषद शाळेला आठवीच्या वर्गाला मान्यता देण्यात आली असुन शाळा आणि शिक्षकांचे अभिनंदन होत आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या अधिकार अधिनियमानुसार तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण व दर्जेत वाढ करण्याकरिता व माध्यमिक वर्ग जोडण्यास सक्षम प्राधिकरण अधिकारी म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालापूर तालुक्यातील वडगाव येथील राजिपच्या प्राथमिक शाळेला दर्जा वाढ आणि माध्यमिक वर्ग म्हणजे इयत्ता आठवीच्या वर्ग वाढीस मान्यता दिली आहे.

प्राथमिक शाळेचा पट वाढविण्यासाठी मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक आणि शाळा कमिटी यांनी प्रयत्न केला असून हि पट वाढ शेकड्यात झाली आहे. विद्यार्थी पट वाढ होण्यासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात आले. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जाणाऱ्या अनेक मुलांनी शाळेची गुणवत्ता, प्रगती, शिक्षणाचा दर्जा, इंग्लिश शिकविणे आणि शिक्षकांची मेहनतीवर विश्वास ठेवून सुमारे २६ विद्यार्थ्यांनी पुन्हा वडगांव शाळेत प्रवेश घेतला आहे. शाळेत आधुनिक तंत्रज्ञान व संगणकीय प्रणाली उपलब्ध आहे.पालकांशी हितगुज, संवाद या बरोबर बैठक देखील होत असतात.



# रा.जि.प. शाळा जामगावच्या विद्यार्थ्यांनी भातपिक लागवडीचा घेतला अनुभव

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

रोह्यातीली जामगाव येथील राजिपच्या प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी आठले वाडीच्या मधुकर चंदने यांच्या शेतावर जाऊन शेतीच्या कामांचा आनंद आणि अनुभव घेतला. अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांना भात पिकं लागवड तसेच शेतीच्या तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी मुख्याध्यापिका प्रिया टोकसे विद्यार्थ्यांना शेतावर घेऊन गेल्या. मुलं-मुली शेतात उतरून प्रथम शेती मशागतीची माहिती त्यांना मधुकर चंदने यांनी सांगितली. प्रत्यक्ष भात रोपांची लागवड करताना ती कशी करावी, याचे प्रात्यक्षिक दाखवल्यानंतर विद्यार्थी शेतात उतरल्यानंतर पारंपारीक गाणी म्हणत भातरोप लावण्याचा अनुभव घेतला.



# चित्रलेखा पाटील यांच्याकडून सांत्वन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कार्ले येथील शेकापचे निष्ठावंत कार्यकर्ते गिरीष पाटील यांचे नुकतेच निधन झाले. शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी त्यांच्या घरी जाऊन गिरीष पाटील यांच्या पत्नीसह कुटूंबाची विचारपूस करून सांत्वन केले.

गिरीष पाटील यांच्यावर किरकोळ कारणावरून हल्ला करून त्यांना तिघांनी जखमी केले. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. पाटील यांच्या निधनाची माहिती मिळताच शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी शुक्रवारी सकाळी कार्ले येथील त्यांच्या घरी जाऊन गिरीष पाटील यांच्या पत्नी स्नेहल पाटील यांची विचारपूस करून त्यांचे सांत्वन केले. यावेळी सरपंच सुहानी पाटील, रंजना पाटील, मानतर्फे झिराडचे सदस्य जयेश पाटील, प्रज्योत पाटील तसेच, महिला, कार्ले ग्रामस्थ व कार्यकर्ते, व गिरीष पाटील यांचे भाऊ रुपेश पाटील व कुटुंबिय उपस्थित होते.



### विजेच्या लपंडावामुळे माथेरानमध्ये

# निसर्ग पर्यटन संस्था उपोषण करणार



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटनस्थळी पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. माथेरानमध्ये पर्यटन हा एकमेव व्यवसाय असून त्यासाठी वीजही महत्वाची बाब आहे आणि माथेरानमध्ये वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. त्यामुळे महावितरणच्या कारभारविरोधात निसर्ग पर्यटन संस्था उपोषण करणार असल्याचे निवेदन निसर्ग पर्यटन संस्थेकडून महावितरणच्या उपअभियंत्यांना देण्यात आले आहे.

माथेरान हे जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असुन येथे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी येत असतात. माथेरानला कुठल्याही प्रकारची शेती होत नसुन पर्यटन हिच माथेरानची शेती आहे. त्यामुळे येथील जीवनमान हे पर्यटनकांवर अवलंबुन आहे. असे असताना महावितरणच्या कारभारचा फटका येथील पर्यटन व्यवसायाला बसत आहे.

शहरात दररोज अनेकवेळा विद्युत पुरवठा खंडित होत असतो. त्यामुळे त्याचा थेट परिणाम येथील पर्यटन व्यवसायावर होत आहे. सध्या ऑनलाईनचे युग असुन येणारे पर्यटक हे शक्यतो ऑनलाईन पेमेंट करत आहेत. तसेच, एटीएमचा वापर देखील करत आहेत. येथील खंडित होणाऱ्या विद्युत प्रवाहाचा फटका पर्यटक व्यवसायाला बसत आहे.

तसेच, माथेरानमध्ये ई-रिक्षा चालु झाल्यामुळे खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्यामुळे ई-रिक्षा चार्जिंग होत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास विलंब होत आहे, त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर होतो याकडे त्यांनी लक्ष वेधले. महावितरणने आपला गलथान कारभार न सुधारल्यास निवेदन दिल्यापासून वीस दिवसात बेमुदत उपोषण करण्याचा इशारा त्यांनी महावितरणला दिला आहे.

### सुधागड तालुका मराठा समाज संस्थेच्यावतीने एक हजार झाडांचे रोपण

# पाली –खोपोली मार्गावरील 'सावली' परतणार

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील पाली-खोपोली राज्य महामार्गवर पाली ते खुरावले फाटा दरम्यान दुतर्फा सुधागड तालुका मराठा समाज संस्थेच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रम रविवारी (दि.७) आयोजित करण्यात आला होता. या राज्यमार्गाचे नुकतेच रुंदीकरण करण्यात आले आहे. रुंदीकरनादरम्यान असंख्य झाडे तोडण्यात आली होती. या वृक्षारोपणामुळे या मार्गावर आता गेलेली सावली पुन्हा परतणार आहे.

या वृक्षारोपण मोहिमेत मराठा समाज बांधवांसह तालुक्यातील अनेक नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला होता. सध्या वातावरणात सातत्याने बदल होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो असून पर्यावरणाचा प्रश्न सर्व जगाला भेडसावत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन ही आजच्या काळाची मोठी गरज आहे, असे प्रतिपादन सुधागड तालुका मराठा समाज संस्थेचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी केले.



सकाळी साडेआठ वाजता वृक्ष लागवडीस नियोजनबद्ध सुरुवात करण्यात आली. पाली, आंबोले, रासळ, वावे, मजरे जांभूळपाडा आणि खुरावले फाटा अशी एकाच वेळी सहा टप्प्यात ही वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली. यावेळी शिसव, कांचन, बेहडा, आवळा, वावळा, करंज, इत्यादी जातीच्या १ हजार झाडांची लागवड करण्यात आली. या वृक्ष लागवड मोहिमेत सुधागड तालुक्यातील मराठा समाज बांधवासह वृक्षप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही वृक्षारोपण मोहीम अध्यक्ष धनंजय साजेकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे कार्याध्यक्ष सरचिटणीस सुजित बारसकर, खजिनदार योगेश मोरे, सर्व संचालक व संचालिका, विभागीय पदाधिकारी, गडकिल्ले, पर्यावरण व वन संवर्धन समितीचे प्रमुख अमित निंबाळकर, संचालक अरविंद दंत, संचालक प्रदीप गोळे, मिलिंद गोळे व समाज बांधव-भगिनी व वृक्षप्रेमी, सुधागड तालुका शेतकरी संघर्ष संघटना, एम.एस.आर.डी.सी, तसेच लेकसिटीचे सदानंद पाटील यांच्या विशेष सहकार्यातून यशस्वी करण्यात आली. राजेंद्र राऊत यांनी ही सर्व झाडे देऊन विशेष सहकार्य केले.

या कार्यक्रमाचा समारोप आंबोले येथील श्री गणेश हॉटेल येथे करण्यात आला. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष बळीराम निंबाळकर व राजेंद्र राऊत यांनीही मार्गदर्शन केले.

> **“सुधागड तालुका मराठा समाज संस्थेच्या माध्यमातून आम्ही केलेली वृक्ष लागवड याचे संवर्धन करण्याची जबाबदारी देखील आम्ही घेतली आहे. लवकरच या झाडांना आधार देऊन ट्री गार्ड बसविण्यांत येईल. तसेच, इच्छेनुसार प्रत्येकाला आम्ही एक ते पाच झाडे दत्तक देऊन ती लोकं त्यांचे संगोपन करतील याची व्यवस्था करणार आहोत.”**
> **– धनंजय साजेकर, अध्यक्ष सुधागड तालुका मराठा समाज**

# कोळी बांधव अरबी समुद्राचे रक्षक



## विजय जाधव यांचे प्रतिपादन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याला सुमारे १७५ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असल्याने हा जिल्हा सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील आहे. त्याकरिता सागरी सुरक्षा महत्त्वाची आहे. भारतीय नौदल सेना, कोस्टगार्ड, पोलीस विभाग, मत्स्य विभाग हे समुद्रात गस्त घालत असले तरी मच्छिमार बांधव हेच समुद्राचे रक्षक असून, ते पोलिसांचे कान, डोळे आहेत, असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव यांनी केले. मुरुड माळी समाज हॉल येथे संवाद कार्यक्रमावेळी ते बोलत होते.

यावेळी कमांडर नेव्ही मुंबई अंकेश बुंदेला, कमांडर सौजन्या, बंदर निरीक्षक सतीश देशमुख, प्रमोद राऊळ, कमांडर आसिफ मुल्ला, कमांडर गौरव, कमांडर सुक्ष्मंम, कमांडर अच्युत, शुभम पाटील, रेवदंडा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले, अविनाश राठोड, सागर रसाळ, अमोल कोलेकर, आकाश सोनावणे, अतुल पाटील, दीपक मोरे, अविनाश रंजन आदींसह पोलीस कर्मचारी, सागर रक्षक, मच्छिमार कोळी बांधव, पोलीस पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.

कमांडर असिफ मुल्ला मच्छिमार कोळी बांधवांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, मासेमारी करताना सर्व प्रकारच्या काळजी घेणे आवश्यक आहे. संकट सूचना, ट्रान्समीटर, लाईफ जॅकेट, लाईफ बॉय, टॉर्च, इतर आवश्यक सागरी सुरक्षा उपकरणे घेऊन जावे, तसेच वैध कागदपत्रे बाळगणे व बायोमेट्रिक कार्डचे महत्त्व सांगितले. खराब हवामानात खबरदारी घेण्याचा आणि मुसळधार पाऊस आणि वादळी हवामानात समुद्रातील आपत्कालीन परिस्थितीत अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा सल्ला यावेळी मुल्ला यांनी दिला.

नौदल सेनेचे पोलीस शुभम पाटील म्हणाले की, तरुण विद्यार्थ्यांनी भारतीय नौदल सेनेमध्ये येऊन भारताचे संरक्षणकर्ते बना. याकरिता Joinindiannavy.com या वेबसाईडवर नेव्हीमध्ये भरती होण्यासाठी सर्वप्रकारची माहिती मिळेल. तरी यांची माहिती घेऊन तरुण विद्यार्थ्यांनी भारतीय नौदल सेनेत भर व्हा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी भवानी मच्छिमार सोसायटीचे माजी चेअरमन प्रकाश पाटील, महेंद्र गार्डी, जागन वाघरे यांनी समुद्रात होणाऱ्या अन्यायाबाबत पाढा वाचला. यावेळी भारतीय नौदल सेनेचे कमांडर यांनी मत्स्य विभागाचे अधिकारी नसल्याने समस्यांवर तोडगा निघाला नाही.परंतु, आमच्याकडून जे सहकार्य करता येईल, तेवढे आम्ही करु, असे आश्वासन कोळी मच्छिमार बांधवांना देण्यात आले.

---

**अलिबाग नगरपरिषद**
**आरोग्य विभाग**
**ई-निविदा सुचना सन २०२४-२५**

अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये संपूर्ण शहरात डास निर्मूलन फवारणी करणेकामी ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सुचना शासनाच्या : https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १२.०७.२०२४ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेंत येईल.

सही/-
**मुख्याधिकारी,**
**अलिबाग नगरपरिषद**

---

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदानसेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.




**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



आजचे अन्नदाते

**अरव किरण पवार,**
**वाढदिवस, अलिबाग**

---

**जाहिरात**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ : रायगड विभाग, पेण.**

येथे मानद तत्वावर समुपदेशक पदासाठी खालील अटी व शर्तीवर अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| पदाचे नांव | समुपदेशक (COUNSELLOR) एकूण ०२ जागा |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | मान्यताप्राप्त विद्यापिठाची/संस्थेची समाजकार्य या विषयांकीत पदव्युत्तर पदवी (M.S.W.) किंवा मान्यता प्राप्त विद्यापीठाची/संस्थेची मानसशास्त्र या प्रमुख विषयातील कला शाखेची पदव्युत्तर पदवी (M.A. Psychology) अधिक समुपदेशन मानसशास्त्र विषयातील पदविका (Advance Diploma in Psychology) |
| अनुभव | समुपदेशन क्षेत्रातील शासकीय/निमशासकीय/मोठया खाजगी संस्थांमधील किमान दोन वर्षाचा अनुभव. |
| इतर अटी व शर्ती | रा.प. महामंडळाच्या रायगड विभागामध्ये ०२ समुपदेशकांची मानद तत्वावर नेमणूक करण्यात येईल व त्याकरिता मासिक मानधन रु.४०००/- देण्यात येईल. प्रथम १ वर्षासाठी सदर पदी मानद तत्वावर नेमणूक देण्यात येईल. सदर काळात केलेल्या कमाचा आढावा घेवून पुढे सदर नेमणूक चालू ठेवायची किंवा नाही हे ठरविण्यात येईल. |
| कर्तव्य | रा.प. महामंडळातील कर्मचाऱ्यांचे विशेषत: चालक कर्मचाऱ्यांमध्ये समुपदेशनाद्वारे मानसिक ताण तणावाचे निवारण करणे, त्यांचेशी वैयक्तिक संवाद साधून अडी अडचणी समजावून घेऊन वैयक्तिक पातळीवर निराकरण करणे व आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ पातळीवर अहवाल पाठवून पुढील उपचाराची गरज निदर्शनास आणून देणे. तसेच आगारास महिन्यातून किमान ०३ वेळा भेटी देणे. |
| नेमणूकीचा कालावधी | सदर नेमणूक निव्वळ मानद तत्वावर असून नेमणूकीचा कालावधी एक वर्ष राहील. आवश्यकता वाटल्यास समुपदेशकाचा कार्यकाल विचारात घेऊन नेमणूकीचा कालावधी वाढविण्यात येईल. सदर नियुक्ती मानद तत्वावर असल्याने रा.प. महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याची वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचे अधिकार/हक्क अर्जदारास/समुपदेशकास नसतील. तसेच सक्षम प्राधिकारी/नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत समुपदेशकाची सेवा समाप्त करण्याचे अधिकारी राहतील. |
| अर्ज करण्याची पध्दत | वरिल अर्हता प्राप्त करणाऱ्या उमेदवारांने फुलस्केप पेपरवर अर्ज टंकलिखित करुन स्वतःचा फोटो स्वतःच्या सहीसह त्यावर चिकटवावा व अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र/गुणपत्रिका व अनुभवाचा दाखला जोडावा. सदर अर्ज दिनांक ३०.०७.२०२४ पर्यंत खालील पत्त्यावर पोहोचेल या बेताने पाठवावा. उमेदवाराने आपला मोबाईल क्रमांक सदर अर्जात नमुद करावा. |
| पत्ता | विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, रा.प. रायगड विभाग, पेण मु. रामवाडी, पो. ता. पेण, जि. रायगड, पिन : ४०२१०७ ई-मेल आय.डी.: dporaigad@rediffmail.com |

सही/-
**विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन रायगड विभाग, पेण**

---

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाचे मिळकतीबाबत मालक श्री.दामोदर देहू गुडेकर, रा.जांभुळवाडी, मोहिली इनाम, ता.पेण, जि.रायगड यांचेसोबत मिळकत खरेदी करण्याची बोलणी केलेली असून सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | पो.ख. (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| मोहिली खालसा | १९० | ०-३०-०० | ०-००-०० | ०.२३ |

वरील वर्णनाची मिळकत व त्यातील दगड, धोंडा, पाणी, जाणे-येण्याचा मार्ग सर्व वहिवाटी, सर्व हक्क दरोबस्त अशी मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असून सोयीकरीता तिला यापुढे सदर मिळकत असे संबोधिले जाईल.

सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे ताबेकब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी मिळकतीचे मुळ मालक यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, भागीदारी खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरूपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता.१२/०७/२०२४

**ॲड.पुष्कर धनदास मोकल**
रा.ईशान्य को.ऑप.हौ.सोसायटी,
बी-विंग, पहिला मजला, फ्लॅट नं.१०३,
महाजन हॉस्पिटलचे बाजुला, चिंचपाडा,
पेण, ता.पेण, जि.रायगड.
मो.नं.९८५०३६११७२/७७७००९५८३३

---

**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. संजय दत्तात्रय उगले, यांची बिनशेती जमीन मिळकतीचे मालक सेल्वीन डिसोजा यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीची, खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १६३/१२ | २५.८६.०० या एकूण क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे हिस्स्याचे व भोगवटासदरी नावे असलेले ०.१२.०० आर.चौ.मी. इतके क्षेत्र विकत दिलेले आहे | १२.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही, व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, २१ (एकवीस) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

कर्जत दि. १३/०७/२०२४
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस- श्री. साई सावली,सो.लि; रूम नं. १०, दुसरा माळा
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन- ४१०२०१
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

---

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

---

**जाहीर नोटीस**

आमचे अशिल मंदा विनोद थळे, वय ४३, रा. फकीर पाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांजतर्फे जाहीर नोटीस देण्यात येते की,

| मौजे | स.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नांदाईपाडा, ता. अलिबाग | १७९ | ०-७१-७० | २.३५ |
| | १७७ | ०-२६-३० | ५.१० |
| | १७१ | ०-०८-१० | १.६० |
| | १६७ | ०-६६-८० | १४.३५ |

सदर मिळकत ही जाहीर नोटीसचा विषय आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये माझा अशिल यांचे हित असून सदर मिळकतीबाबत दावा क्र. RTS ५४ २०२३ महसूल न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. असे असतानाही वर उल्लेख केलेल्या मिळकतीमधील भोगवटाधारक तारामती अनंत पाटील व वगैरे हे आमच्या अशिलांच्या अपरोक्ष, आमच्या अशिलांचा विश्वासघात करून वर नमूद केलेली जमिन अन्य त्रयस्थ इसमास विक्री करू पहात आहेत. याबाबत आमच्या अशिलांस खात्रीशीर माहिती मिळालेली आहे.

तरी वर नमूद केलेल्या जमिनींचा व्यवहार कोणीही तारामती अनंत पाटील व वगैरे यांसोबत करू नये. तसे केल्यास त्यास आमच्या अशिलांची सक्त हरकत राहील व आमचे अशिल संबंधित व्यक्ती व जमिन मालक यांचेविरूद्ध योग्य ती कायदेशिर कारवाई करतील.

अलिबाग
दि. १२/०७/२०२४

सही/-
**ॲड. हर्षल पाटील**

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमुद केलेल्या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती. रत्नप्रभा रत्नाकर पवार रा.मु.किहीम, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडून खाली वर्णन केलेल्या मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी सुद्धा त्यांच्याबरोबर केली आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| किहीम तलाठी सजा किहीम ता.अलिबाग जि.रायगड | २६६ | ०-६४-०० पो.ख.०-०२-८० एकूण क्षेत्र ०-६६-८० | ६-१२ |

तरी वरील जमिन मिळकतींबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात सात दिवसाच्यामध्ये दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशीर बाबींची पुर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी. तसेच सदरहु क्षेत्राबाबत हरकत असल्यास तसा दस्त हरकतीसोबत पाठविण्यात यावा.

अलिबाग
दिनांक : १३/०७/२०२४

**ॲड.निकेत रामचंद्र चवरकर**
पत्ता : त्रिवेणी कॉम्प्लेक्स् रूम नं.८,
रोहिदास नगर रोड, चेंढरे ता.अलिबाग
जि.रायगड मो.नं. ९०४९४९२३८०.

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अमित जोतमल जैन, रा.राम मंदिर जवळ, नेरळ जुनी बाजार पेठ, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड, ४१०१०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.
**मिळकतीचे वर्णन : मौजे बोर्ले, ता.कर्जत, जि.रायगड, येथील बिनशेती जमिन मिळकत.**

| स.नं | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ६/११/अ/२/११/ब/२२ | २.९९.०० | २९.९० | श्री.रोहित सुरेश खोपकर |
| ६/११/अ/२/११/ब/२३ | २.८५.०० | २८.५० | श्री.रोहित सुरेश खोपकर |

वरील वर्णनाच्या बिनशेती जमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे, हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या २१(एकवीस) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक : १३/०७/२०२४

सही/-
**ॲड.उषा जे.कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो नं. ७३८५००४८०६

---

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(तहसिलदार कार्यालय, मुरूड जंजिरा, दरबार रोड, ता.मुरूड, जि.रायगड)**
ज.म.र.अर्ज ०४/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति,
सुफियान निसार हवाल्दार — अर्जदार
रा.मजगाव, ता.मुरूड जंजिरा, जि.रायगड
विरूद्ध
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव, — सामनेवाला
ता.मुरूड जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त सुफियान निसार हवालदार त्यांचे आजोबा कै.हुसेन महमद जाफर हवालदार ही दिनांक २६/०७/१९९६) रोजी राहत्या घरी म्हणजे मुरूड जंजिरा, रा.मुरूड जि.रायगड येथे मयत झालेली असून त्यांच्या मृत्यूची नोंद नगरपरिषद मुरूड यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/ मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी कै.हुसेन महमद जाफर हवालदार या दिनांक २६/०७/१९६९ रोजी मयत झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दि.१३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांचे आजोबा कै.हुसेन महमद जाफर हवालदार ही यांची जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये मृत्यूची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.१०/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळाव,

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरूड जंजिरा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(तहसिलदार कार्यालय, मुरूड जंजिरा, दरबार रोड, ता.मुरूड, जि.रायगड)**
ज.म.र.अर्ज ६६/२०२४

**जाहीर नोटीस**

नोटीस : ज.म.र अर्ज /२०२४
प्रति,
बशीर अहमद उमर परकार — अर्जदार
रा.उसरोली, ता.मुरूड जंजिरा, जि.रायगड
विरूद्ध
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, — सामनेवाला
ता.मुरूड जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार बशीर अहमद उमर परकार यांची पत्नी जन्म ही दिनांक ०२/०५/१९६६ रोजी त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी फरीदा बदरूद्दिन हामदुले जन्म दिनांक ०२/०५/१९६६ जन्मदाखला नोंद झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दि.१३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांची पत्नी फरीदा बदरूद्दिन हामदुले यांची जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्म नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळाव,

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरूड जंजिरा**

---



**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१३ जुलै**

१) श्रीम.वंदना विढोबा पाटील
१३-०७-१९४७, अलिबाग

२) श्री.हरेश्वर नारायण पाटील
१३-०७-१९६०, बोरिस, अलिबाग

---

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल गिता चंद्रिका गुप्ता, यांनी दुकान गाळा मिळकतीचे मालक १.सौ.संध्या शरद देशमुख आणि २.सुधा चंद्रकांत जगताप (मयत) यांचे वारस १.प्रशांत चंद्रकांत जगताप, २.योगेश चंद्रकांत जगताप, ३.श्री.चंद्रकांत पांडुरंग जगताप, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीची, खालील वर्णनाची दुकान गाळा मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे-मुद्रे खुर्द, ता.कर्जत येथील स.नं.५अ/३अ, ३ब/१, ३ब२ प्लॉट नं.१ ते ४ यावरील ''स्वप्ननगरी' या इमारती मधील तळमजल्यावरील दुकान गाळा नं.११, क्षेत्र २११ चौ.फुट बिल्टअप, कर्जत न.पा.घर नं.३१५ क/०३

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही, व कसल्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ७(सात) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट, यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर दुकान गाळा मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, दुकान गाळा विक्री करारनामा, करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत — कळावे.

दि.१३/०७/२०२४
**ॲड.संदीप मारूती घरत**
ऑफिस : श्री.साई सावली, सो.लि., रूम नं.१०,
दुसरा माळा कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

---

**वार्षिक सर्वसाधारण सभा**
**(फक्त सभासदांसाठी)**

दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेडची वार्षिक सर्वसाधारण सभा मे. चेअरमन साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ३०/०७/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड अलिबाग येथील कार्यालयात भरणार आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील कामे**

१) मागील दि. २८/०६/२०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व मान्यता देणे.
२) सन २०२३-२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकावर चर्चा करणे व स्विकृत करणे.
३) सन २०२३-२४ चा वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल वाचन करणे.
४) कायदा व नियम यास अनुसरून संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
५) सन २०२२-२३ च्या दोष दुरूस्ती अहवालास मंजुरी देणे.
६) सन २०२४-२५ सालाकरीता लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण कामी नेमणुक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे.
७) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
८) पुढील वर्ष सन २०२४-२५ सालाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
९) बिगर सभासदांची बचत खाती अनक्लेम डिपॉझिटमध्ये वर्ग करणेबाबत.
१०) के.वाय.सी. पूर्तता न केलेल्या सभासदांची यादी पेपरमध्ये जाहीर करणेबाबत.
११) सभासद कल्याण निधी लाभांश समीकरण निधीमध्ये वर्ग करणेबाबत.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

अलिबाग
दिनांक :- १२/०७/२०२४

सही/-
**श्री. प्रमोद दत्तात्रेय पाटील**
(चेअरमन)

---

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक प्रफुल्लचंद्र विठ्ठल बिलये आणि आशल प्रफुल्लचंद्र बिलये, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग, | ८९५/३ | जिरायत ०-४०-१० बागायत ० ३१ ३० पो.ख. ०-०४-२० एकुण ०-७५-६० | २६.४९ |

वर नमुद संपुर्ण मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक १५ मे २०२४ रोजी, दैनिक कृषिवल या वृत्तपत्रामध्ये जाहीर केलेली नोटीस या नोटीसीने रद्द झाली आहे असे समजण्यात यावे.

अलिबाग
दि. १०/०७/२०२४
मोबा. ९९२२७९८५२८

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. चिंचपा गल्ली, नागाव
ता. अलिबाग, जि. रायगड

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**
ज.म.र. अर्ज ६४/२०२४

**जाहीर नोटीस**

**नोटीस :**
प्रति,
बशीर अहमद उमर परकार — अर्जदार
रा. उसरोली, ता.मुरूड जंजिरा, जि.रायगड
**विरूध्द**
ग्रुप ग्रामपंचायत उसरोली, — सामनेवाला
मु. पो. उसरोली
ता. मुरूड जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहीर नोटीसद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार बशीर अहमद उमर परकार यांचा जन्म दिनांक २४/०३/१९६१ रोजी ग्रुप ग्रामपंचायत उसरोली, ता. मुरूड, जि. रायगड येथे त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत उसरोली यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲन्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी बशीर अहमद उमर परकार यांचा जन्म दिनांक २४/०३/१९६१ रोजी. जन्म नोंदणी झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयात दि. १३/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार बशीर अहमद उमर परकार यांची जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्म नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.९/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे,

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरुड जंजिरा**

# पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारत सज्ज

**112 खेळाडूंचा सहभाग | 66 पुरुष आणि 47 महिला**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

'पॅरिस ऑलिम्पिक २०२४'ला येत्या २६ जुलैपासून सुरूवात होत असून यावेळी एकूण ११२ भारतीय खेळाडू ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणार आहेत. यात ६६ पुरुष तर ४७ महिला खेळाडू या मोठ्या स्पर्धेसाठी पॅरिसला जाणार आहेत. २०२२ च्या ऑलिम्पिकमध्ये भारताच्या नावावर एकूण ७ पदके होती. ज्यात १ सुवर्ण, २ रौप्य आणि ४ कांस्य पदकांचा समावेश होता. यंदाच्या या ऑलिम्पिकमध्ये भारताकडून कोणकोणत्या खेळासाठी कोणते खेळाडू पात्र ठरले आहेत, याची एक सविस्तर यादी जाहिर करण्यात आली आहे.

नीरजने २०20 टोकियो ऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला होता. यंदाच्या ऑलिम्पिकमध्येही नीरजकडून देशाला सुवर्णकामगिरीची अपेक्षा आहे. नीरजशिवाय बॅडमिंटन आणि हॉकी संघाकडूनही भारताला पदकांची आशा आहे. यावेळी भारतीय हॉकी संघ सुवर्णपदक जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. कुस्तीत विनेश फोगटकडून पदकाच्या आशा आहेत. यावेळी सात्विक-चिरागच्या जोडीवर विशेष लक्ष असेल. याशिवाय लव्हेलिना-निखत यांच्याकडून बॉक्सिंगमध्येही भारतीय चाहत्यांना पदकाची आशा असेल.




**बॅडमिंटन** - एचएस प्रणॉय, लक्ष्य सेन, पीव्ही सिंधू, सात्विकसाईराज रँकीरेड्डी, चिराज शेट्टी, अश्विनी पोनप्पा, तनिषा कृष्टो.

**भालाफेक**- नीरज चोप्रा, किशोर जेना, अन्नु राणी

**बॉक्सिंग** - निखत जरीन, अमित बुरशी, निशांत देव, प्रीती पवार, लव्हलिना बोरगोहेन, जास्मिन लांबोरिया.

**नौकानयन**- विष्णु सावरणन, नेत्रा कुमानन

**पोहणे**- धिनिधी देसिंघू, श्रीहरी नटराज

**टेबल टेनिस**- शरथ कमल, हरमिर देसाई, मानव ठक्कर, मनिका बत्रा, श्रीजा अकुला, अर्चना कामथ.


**गोल्फ**- गगनजीत भुल्लर, अदिती अशोक, दिक्षा डागर

## भारतीय खेळाडूंची यादी

**नेमबाजी**
पृथ्वीराज तोंडाईमन, राजेश्वरी कुमार, संदीप सिंग, अर्जुन बबुता, स्वप्निल कुसळे, ऐश्वर्य प्रताप सिंग, सिफत कौर समरा, अंजुम मौदगिल, एलावेनिव वेल्वारिय, रमिता जिंदाल, संदीप सिंग, अर्जुन बाबुता, रमिता जिंदाल, अर्जुन चिमी, सरबज्योत सिंग, मनू भाकर, रिदम संगवम, विजयवीर सिद्धू, अनिश भानवाला, मनू भाकर, ईशा सिंग, सरबज्योत सिंग, अर्जुन चीमा.

**ॲथलेटिक्स**
अक्षदीप सिंग, विकास सिंग, परमजीत सिंग बिश्त, अविनाश साबळे, पारुल चौधरी, ज्योती याराजी, किरण पहल, तजिंदरपाल सिंग तूर, आभा खटुआ, सर्वेश कुशारे, प्रवीण चित्रवेल, अब्दुल्ला अबूबकर, मुहम्मद अनस याहिया, मोहम्मद अजमल, अमोज जैकब, संतोष तमिलारासन, राजेश रमेश, विद्या रामराज, ज्योतिका श्री दांडी, एमआर पूवम्मा, सुभा व्यंकटेशन, प्रियांका गोस्वामी, सूरज पनवार.



हॉकी : पुरुष संघ आणि महिला संघ


टेनिस : रोहन बोपण्णा



गोल्फ : शुभंकर शर्मा

**टेनिस** : समित नागल, श्रीराम बालाजी.
**कुस्ती** : अमन सेहरावत, विनेश फोगट निशा दहिया, रितिका हुडा, अंतिम पंघाल, अंशू मलिक.



ॲथलेटिक्स : प्रियांका गोस्वामी


नेमबाजी : सरबज्योत सिंग


नौकानयन : नेत्रा कुमानन


रोइंग : बलराज पनवार


घोडेस्वारी : अनुष अग्रवाल


वेटलिफ्टिंग : मीराबाई चानू


ज्युडो : तुलिका मान

## राज्यस्तरीय बुद्धीबळ निवड चाचणीचे आयोजन

**। अकोला । वृत्तसंस्था ।**

राज्यस्तरीय बुद्धीबळ स्पर्धेच्या निवड चाचणीचे अकोल्यात आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेशी संलग्नित अकोला महानगर डिस्टीक्ट चेस असो. व प्रभात किड्स स्कूल यांच्या संयुक्तपणे आयोजित ही निवड चाचणी दि.२० व २१ जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून आकोल्यातील पातूर रस्त्यावरील प्रभात किड्स स्कूलमध्ये होणार आहे.



या चाचणीत मुलामुलींसाठी ७, ९, ११, १३, १५, १९ असे सहा वयोगट ठेवण्यात आले आहेत. दि. २० जुलै रोजी ७, ११, १५ व १९ वर्षा आतील गटातील स्पर्धा होऊन दि.२१ जुलै रोजी ९, १३ व खुल्या गटातील स्पर्धा होणार आहेत. यामध्ये ७, ९, ११, १३ वर्षाखालील वयोगटात प्रथम दोन मुलामुलींची निवड राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धे साठी करण्यात येणार असुन १५ व १९ वर्षाखालील गटात व खुल्या गटातील प्रथम चार मुलामुलींची निवड राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धे साठी करण्यात येणार आहे.

ही स्पर्धा सध्या अकोला जिल्हातील खेळाडुंसाठी असून यात सात वर्षाखालील गटात जानेवारी २०१७ नंतर जन्मलेले खेळाडू खेळु शकतात. नऊ वर्षांआतील गटात जानेवारी २०१५ च्या नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात. तर, ११ वषाखालील गटात जानेवारी २०१३ नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकणार आहेत. १३ वर्षाखालील गटात जानेवारी २०११ नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात. १५ वर्षाखालील गटात जानेवारी २००९ च्या नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात. तर, १९ वर्षाखालील गटात जानेवारी २००५ च्या नंतर जन्मलेले खेळाडु खेळु शकतात. या स्पर्धेसाठी एमसीए नोंदणी असणे आवश्यक असून, खेळाडूंनी वयाचा पुरावा आणणे आवश्यक आहे.

## वनिंदू हसरंगाची कर्णधारपदावरून माघार

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

भारत-श्रीलंका यांच्यातील आगामी क्रिकेट मालिकेचे वेळापत्रक गुरुवारी (दि.११) जाहीर करण्यात आले होते. उभय देशांमधील ही मालिका श्रीलंकेत पार पडणार आहे. दोन देशांमध्ये तीन टी-२० सामन्यांची व तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार असून २६ जुलैपासून या मालिकेला प्रारंभ होणार आहे. मात्र, त्यापूर्वीच श्रीलंकेला मोठा धक्का बसला आहे.

भारताविरुद्ध मालिकेच्या पार्श्वभूमीवर श्रीलंकेला एक धक्का बसला आहे. अष्टपैलू खेळाडू वनिंदू हसरंगा याने श्रीलंकेच्या टी-२० संघाच्या नेतृत्वपदावरून माघार घेतली आहे. टी-२० विश्वकरंडकात सुमार कामगिरी केल्यामुळे हसरंगा याने नेतृत्व सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, खेळाडू म्हणून तो संघात कायम राहणार आहे.




## सुरेश देवभक्त यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

माजी रणजीपटू सुरेश अनंत देवभक्त यांचे गुरुवारी वृद्धापकाळाने विरार येथील राहत्या घरी निधन झाले आहे. ते ८३ वर्षांचे होते. सुरेश देवभक्त दोदू या नावाने प्रसिद्ध होते.



वयाच्या १२व्या वर्षा पासून तालुका क्रिकेटमध्ये खेळणाऱ्या देवभक्त यांनी स्थानिक स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी केली होती. १९७१ मध्ये त्यांनी रणजी करंडक मध्ये अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली रणजी सामना खेळला होता. त्यांनी अनेक क्रिकेटच्या स्पर्धा गाजविल्या होत्या. नॅशनल क्रिकेट क्लब यंग मेन्स आणि नवरोझ क्रिकेट संघातर्फे खेळताना त्यांनी अनेक पराक्रम होते केले.


## जास्मीन, बार्बरा अंतिम फेरीत

**। विम्बल्डन । वृत्तसंस्था ।**

विम्बल्डन २०२४ स्पर्धा अखेरच्या टप्प्यात आली असून गुरुवारी (दि.११) महिलांची एकेरीची उपांत्य फेरी पार पडली. या उपांत्य फेरीत ७ व्या मानांकित जास्मीन पाओलिनी आणि ३१ व्या मानांकित बार्बरा क्रेसिकोवा यांनी विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

जास्मीन पाओलिनीने डोना विकेचला २-६, ६-४, ७-६ (८) अशा तीन सेटमध्ये पराभूत केले. २तास५१मिनिटेचाललेल्या या सामन्यातील विजयामुळे आता पाओलिनी अंतिम सामन्यात पोहचली आहे. ओपन एरामध्ये अंतिम सामना गाठणारी इटलीची पहिली टेनिसपटू ठरली आहे.

बार्बरा क्रेसिकोवाने चौथ्या मानांकित एलिना रायबाकिनाला २ तास ७ मिनिटे चाललेल्या उपांत्य सामन्यात ३-६, ६-३, ६-४ अशा तीन सेटमध्ये पराभूत केले. आता बार्बरा क्रेसिकोवा दुसऱ्यांदा ग्रँडस्लॅम च्या अंतिम सामन्यात खेळताना दिसणार आहे. तिने यापूर्वी २०२१ मध्ये फ्रेंच ओपन स्पर्धा जिंकली होती.



## बेन स्टोक्सने रचला अनोखा विक्रम

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड आणि वेस्ट इंडिज या संघांमध्ये खेळल्या जात असलेल्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात अनेक मोठे विक्रम होत आहेत. मालिकेतील पहिल्याच कसोटी सामन्यात इंग्लंड संघात पदार्पण करणाऱ्या गस ॲटकिन्सनने ७ बळी घेत ४८ वर्षे जुना विक्रम मोडला. त्याचवेळी संघाचा स्टार गोलंदाज जेम्स अँडरसनही शेवटचा सामना खेळत आहे. अँडरसन ७०० हून अधिक बळी घेणारा आणि ४० हजारांहून अधिक चेंडू टाकणारा इंग्लंडचा पहिला खेळाडू ठरला आहे. आता संघाच्या कर्णधारानेही एक विक्रम आपल्या नावावर केला आहे.

बेन स्टोक्सने वेस्ट इंडिजविरूद्ध कसोटीतील पहिल्या डावात सर्वाधिक धावा करणाऱ्या मायकेल लुईसला बाद केले. स्टोक्सने ८ षटकांत केवळ १४ धावा दिल्या. दुसऱ्या डावातही कर्क मॅकेन्झीला पहिल्याच षटकात बाद केले. त्यानंतर लुईसचाही बळी घेतला. स्टोक्सची बॅट शांत असली तरी तो चेंडूने मात्र जबरदस्त कामगिरी करताना दिसत आहे.

बेन स्टोक्सने पहिल्या कसोटीतील दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा खेळाडू कर्क मॅकेन्झीचा बळी घेतला. बेन स्टोक्सच्या कसोटी कारकिर्दीतील हा २०० वा बळी होतो. स्टोक्सने १०३ कसोटी सामन्यांमध्ये ही कामगिरी केली आहे.

इंग्लंड क्रिकेट संघाचा कर्णधार बेन स्टोक्सने आपल्या कारकिर्दीत एकूण १०३ कसोटी सामने खेळले आहेत. यामध्ये त्याने ६३२० धावा आणि २०० बळी घेतले आहेत. अशी कामगिरी करणारा तो इंग्लंडचा पहिला आणि जगातील तिसरा खेळाडू ठरला आहे.

## सामना संपताच चाहत्यांमध्ये राडा

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**



कोपा अमेरिका स्पर्धेतील उपांत्य फेरीत कोलंबिया विरुद्ध उरुग्वे संघात रोमांचक सामना गुरुवारी (दि.११) पार पडला. या सामन्यात कोलंबियाने जेफरसन लेर्माने केलेल्या गोलच्या जोरावर उरुग्वेवर १-0 अशा फरकाने विजय मिळवला. मात्र, या सामन्यानंतर स्टेडियममध्ये मोठा वाद झाल्याचे पाहायला मिळाले. या वादाचे व्हिडिओही सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या सामन्यानंतर दोन्ही संघांच्या चाहत्यांमध्ये हाणामारी झाली होती, ज्यात उरुग्वेचा स्टार स्ट्रायकर डारविन नुनेजसह इतर खेळाडू देखील सामील झाल्याचे दिसून आले.

या सामन्यासाठी ७० हजारांहून अधिक प्रेक्षक स्टेडियममध्ये उपस्थित होते. यातील जवळपास ९० टक्के प्रेक्षक कोलंबियाचे समर्थक होते. पण, काहीप्रमाणात उरुग्वेचे समर्थकही स्टेडियममध्ये होते. यावेळी सामन्यानंतर त्यांच्यात वाद झाले आणि प्रकरण मारामारीपर्यंत पोहोचले. यानंतर उरुग्वेचे खेळाडू पायऱ्या चढत होते. यादरम्यान, ते देखील या वादात सामील झाले. त्यानंतर पोलिस आणि सुरक्षा रक्षकांना हे वाद सोडवण्यासाठी जवळपास १० मिनिट लागले.

दरम्यान, उरुग्वेचा कर्णधार जोस मारिया गिमेनेझने असे सांगितले की, खेळाडू त्यावेळी त्यांच्या कुटुंबाला सुरक्षित ठेवण्याच्या प्रयत्नात होते. यानंतर दक्षिण अमेरिका फुटबॉल संघटना कॉनमेबोल यांनी या भांडणावर निराशा व्यक्त केली आहे. तसेच, एका स्टेटमेंटमध्ये लिहिले आहे की, मकॉनमेबोलने घडलेल्या घटनेबाबत चौकशी सुरू केली असून सामन्यानंतर झालेल्या हिंसाचारामध्ये कोण सामील होते, याची चौकशी केली जाणार आहे.

## नोवाक जोकोविचचे पारडे जड

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

मागरिट कोर्ट यांच्यासह सर्वाधिक ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावण्याचा विक्रम नावावर असलेल्या नोवाक जोकोविचसमोर होत असलेल्या विम्बल्डन टेनिस ग्रँडस्लॅमच्या उपांत्य फेरीत लोरेंझो मुसेटीचे आव्हान असणार आहे. नोवाक जोकोविच याने उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीसाठी टेनिसकोर्टवर न उतरताच उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. ॲलेक्स दी मिनॉर याने दुखापतीमुळे माघार घेतल्यामुळे जोकोविचला उपांत्य फेरीत पाऊल ठेवता आले. जोकोविच-लोरेंझो मुसेटी यांच्यामध्ये आतापर्यंत सहा लढती पार पडलेल्या आहेत. त्यापैकी पाच लढतींमध्ये जोकोविचने विजय संपादन केले आहे. यंदा फ्रेंच ओपन स्पर्धेत हे दोन्ही खेळाडू एकमेकांसमोर आले होते. जोकोविचने पाच सेटच्या झुंजीनंतर विजय मिळवला होता. या लढतीनंतरच जोकोविचला दुखापत झाली होती. सर्बियाच्या नोवाक जोकोविचचे पारडे यावेळी जड आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

## रोह्याच्या राकेशची रायगड संघात निवड

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील जय बजरंग रोहा कबड्डी संघाचा अष्टपैलू खेळाडू राकेश गायकवाड याची दि. १५ ते १७ जुलै रोजी पुणे (बालेवाडी) येथे होणाऱ्या ७१ व्या प्रौढ गट पुरुष राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कबड्डी संघात निवड झाली आहे.



अजिंक्यपद कबड्ड स्पर्धे करिता नुकतेच अलिबाग येथे १० दिवसांचे सराव शिबीर संपन्न झाले. राकेश गायकवाड हा खेळाडू रायगड पोलीस दलात कार्यरत असून नुकत्याच झिराड येथे झालेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत त्याला सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून बक्षीस देऊनही गौरविण्यात आले होते. आपल्या अंगातील मुलभूत कौशल्याच्या बळावर व तो कबड्डी खेळासाठी घेत असलेली मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने हे सुयश मिळविले आहे. तर, रायगड प्रौढ गटात निवड झालेला जय बजरंग रोहाचा तो पहिलाच खेळाडू आहे. राकेशच्या या सुयशाबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी राकेशच्या सुयशाबद्दल त्याचे अभिनंदन करून त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच, समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्यासह क्रीडा प्रेमी नागरिक यांच्याकडूनही अभिनंदन होताना दिसत आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- अलिबाग मधिल ऑफिस करिता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन,आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९८२२९३८४४४
- अलिबागमध्ये आर्किटेक्चरल फर्मकरीता ऑटोकॅड ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क- ९४२२०९४१५१, ९२७०८२७८२९.
- शॉप भाडेने देणे आहे. आत २००sq.ft. आणि बाहेर २०० sq.ft.R.C.F. कॉलनी समोर, साळवी ऑटोचे शेजारी, भाडे -१०,०००/- ८२०८३७२०३०, ७७५८००३४५६
- रसिक हार्डवेअर अलिबाग ९४२२६९०८५४, दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# रायगड जिल्ह्याचा पुरूष संघ जाहीर

**। गडब । वार्ताहर ।**

पुणे बालेवाडी येथे होणाऱ्या १५ ते १७ जुलै दरम्यान ७१ व्या महाराष्ट्र राज्य अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनने पुरूष गटाचा कबडी संघ जाहीर केला आहे. या संघाचे सराव शिबीर पांडवादेवी येथील जय मंगल सभागुहात घेण्यात आले होते. या सराव शिबिराची सांगता समारंभा प्रसंगी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह जे.जे. पाटील, हिराचंद पाटील, प्रथमेश पाटील, जनार्दन पाटील, फिटनेस ट्रेनर संतोष शिर्के, राष्ट्रीय खेळाडु ऋणाली मोकल, अशिष पाटील, सुधिर पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.



यावेळी जिल्हा असोसिएशनने उत्तम प्रकारे सराव शिबीर आयोजित केले होते. रायगड जिल्ह्याच्या पुरुष गटाच्या कबड्डी संघाने राज्य अंजिक्यपद कबड्डी स्पर्धेत चांगली कामगिरी करावी असे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह जे. जे. पाटील यांनी यावेळी खेळांडुना मार्गदर्शन करताना सांगितले.

खेळांडुनी सराव शिबिरात कसुन सराव केला असुन रायगडचा संघ राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत चमकदार कामगिरी करेल असे संघाचे प्रशिक्षक प्रथमेश पाटील, व्यवस्थापक हिराचंद पाटील यांनी सांगितले. राज्य अंजिक्यपद स्पर्धेत सांघिक खेळ करुन या स्पर्धेत विजय संपादन करु, असे खेळांडुनी सांगितले. तसेच, जिल्ह्याच्या कबड्डी संघात निवड झालेल्या खेळांडुचे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

**कबड्डी संघ**
*ऋत्विक पाटील (कर्णधार), प्रशांत जाधव (उपकर्णधार), मयूर कदम, निलेश थळे, दिपक कासारे, प्रतिक बैलमारे, अनुराग सग, राकेश गायकवाड, सुमित पाटील, प्रणव ईदूलकर, वैभव मोरे, निखिल शिर्के, संघव्यवस्थापक हिराचंद पाटील, संघ प्रशिक्षक प्रथमेश पाटील.*

# असा हा इस्रायल



इस्रायल हा मध्य-पूर्व आशियातला छोटासा देश आहे. अमेरिकेतल्या न्यू जर्सी या राज्याएवढा या देशाचा आकार आहे. इथलं हवामान वैविध्यपूर्ण आहे. देशाच्या उत्तरेकडे बर्फाळ डोंगर पहायला मिळतात तर दक्षिणेकडे उष्ण वाळवंट आहे. जॉर्डन, सिरिया, पॅलेस्टाईन, लेबेनॉन आणि इजिप्त हे इस्रायलचे शेजारी देश आहेत. इस्रायलमध्ये भूमध्य समुद्र आहे. मृत समुद्र हे सुद्धा इस्रायलचं प्रमुख आकर्षण आहे. मृत समुद्र खूप खारा आहे. तसंच याचं पाणी वर्षभर गरम असतं. समुद्रात मीठाचं प्रमाण खूप जास्त असल्याने मासे, समुद्री वनस्पती जगू शकत नाहीत. इथल्या नेगेव वाळवंटात वर्षभरात फक्त एक इंच पाऊस पडतो. उत्तरेकडचा गॅलिली हा देशातला सर्वात सुपीक भूभाग आहे.

इस्रायलमध्ये ज्यू धर्मीयांचं प्रमाण जास्त आहे. इथले ७५ टक्के लोक ज्यू आहेत तर उरलेले अरब आहेत. या देशात हिब्रू आणि अरेबिक या भाषा बोलल्या जातात. शेकेल हे इथलं चलन आहे. जेरूसलेम ही इस्रायलची राजधानी. जॉर्डन ही इथली प्रमुख नदी. इथे हायना, कॅस्पियन टर्टल्स, बोअर्स असे प्राणी आढळतात. खेकडे, कासवं, ऑक्टोपस आणि शार्क इथल्या लाल समुद्रात आढळतात. साप, मोठ्या पाली आणि वटवाघुळंही इथे आहेत.

**सफर देशांची**

लाकूड आणि शेतजमिनींसाठी १९०० मध्ये इस्रायलमध्ये बरीच झाडं तोडण्यात आली. पण आता इथे नव्याने झाडं लावली जात आहेत. गेल्या ६० वर्षांमध्ये इस्रायलमध्ये २०० दशलक्ष झाडं लावण्यात आली आहेत. इथे राष्ट्रीय उद्यानंही आहेत. इस्रायल हा १०० टक्के लोकशाही असलेला मध्य-पूर्वेतला एकमेव देश आहे.

# थ्रीडी आर्चरी आणि ॲक्वाबाईक




थ्रीडी आर्चरी हा तिरंदाजीचा एक प्रकार आहे. यात तिरंदाजाला लक्ष्याचा भेद करायचा असतो. लक्ष्य किती लांब आहे याचा कोणताही अंदाज तिरंदाजाला नसतो. हा खेळ खेळण्यासाठी खेळाडूला तिरंदाजीचं उत्तम ज्ञान असणं गरजेचं असतं. यासोबतच तिरंदाजाने लक्ष्याच्या अंतराचा अंदाज बांधणं गरजेचं असतं. थ्रीडी आर्चरी हा खेळ हौशी आणि स्पर्धात्मक अशा दोन्ही पद्धतींनी खेळला जातो. थ्रीडी आर्चरीमध्ये लक्ष्यांचा आकार प्राण्यांसारखा असतो. हा खेळ विविध क्लबजमध्ये खेळला जातो. मिळणाऱ्या गुणांवरून विजेता ठरवला जातो.

ॲक्वाबाईक हा एक प्रकार आहे. हा क्रीडाप्रकार म्हणजे ट्रायथलॉनसारखाच खेळ आहे. या खेळाला ट्रायथलॉनचा छोटा अवतार असं म्हटल्यास वावगं ठरू नये. ॲक्वाबाईकमध्ये धावायचं नसतं. या क्रीडाप्रकाराची सुरूवात अमेरिकेत झाली. ट्रायथलॉन खेळणाऱ्या बऱ्याच खेळाडूंना दुखापतीमुळे हा खेळ सोडवा लागतो. अशा खेळाडूंसाठी ॲक्वाबाईक हा खेळ सुरू करण्यात आला. यात धावण्याची गरज नसल्याने खेळाडू सहज सहभागी होऊ शकतात. ॲक्वाबाईकमध्ये थोडं पोहायचं असतं आणि थोडी बाईक चालवायची असते. हा क्रीडाप्रकार लोकप्रिय होत आहे.

**स्पोर्टस फन**

# संधी फोरेन्सिक सायन्समधल्या



तुमच्या अंगी धाडस असेल आणि काहीतरी वेगळं करण्याची इच्छा असेल तर फोरेन्सिक विज्ञान या क्षेत्रात करीअर करता येईल. प्रत्येक क्षेत्रात आता विज्ञानाची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे विज्ञान शाखा घेऊन तुम्ही विज्ञानाशी संबंधित विविध शाखांची निवड करू शकता. फोरेन्सिकविज्ञानाचा वापर करून तुम्ही गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांची मदत करू शकता. या क्षेत्रात करीअर करताना काय करायला हवं याविषयी...

या क्षेत्रात करीअर करणाऱ्या विद्यार्थ्यांना विज्ञानाची चांगली माहिती असायला हवी. एकाग्रता, संघभावना, कामाची आवड ही कौशल्यं असायला हवी. विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्ही फोरेन्सिक विज्ञानाची निवड करू शकता. फोरेन्सिक विज्ञान आणि क्रिमिनोलॉजीमध्ये डिप्लोमा करून तुम्ही या क्षेत्रात प्रवेश करू शकता. या क्षेत्रात मास्टर्स पदवी मिळवण्यासाठी बारावीत फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी, बायोकेमिस्ट्रीपैकी एका विषयात किमान ५० टक्के गुण मिळणं गरजेचं आहे.

**कोण होणार?**

बीएससी इन फोरेन्सिक सायन्स, डिप्लोमा इन फोरेन्सिक सायन्स अँड क्रिमिनॉलॉजी, डिप्लोमा इन फोरेन्सिक सायन्स ॲण्ड लॉ, एमडी इन फोरेन्सिक सायन्स, एमएससी इन क्रिमिनॉलॉजी अँड फोरेन्सिक सायन्स असे अभ्यासक्रम निवडून तुम्ही पुढे जाऊ शकता.

# घास ३२ वेळा का चावायचा?

बालमित्रांनो, जेवताना अनेकदा आपल्याला मोठ्यांकडून घास ३२ वेळा चावा, असं सांगितलं जातं. पण खरंच घास ३२ वेळा चावून खायचा असतो का? त्याचे नेमके काय फायदे आहेत हे जाणून घेऊ.

जेवताना तुम्हाला कधी कधी आई, वडील किंवा ज्येष्ठांनी एक घास ३२ वेळा चावून खा, असं सांगितलं असेल. ३२ वेळा घास चावून खाल्यास आरोग्याला अनेक फायदे मिळतात, असंही सांगितलं जातं. हे तत्व लोक खूप पूर्वीपासून पाळत आहेत. यामागे वैज्ञानिक आणि आरोग्याशी संबंधित कारणंही आहेत. घास ३२ वेळा चाऊन खाल्ल्यास अन्न चांगल्या प्रकारे पचतं. हा नियम प्रत्येकासाठी नाही. पण व्यवस्थित चाऊन खाणं फायदेशीर असतं. अन्न जास्त चघळले की त्याचे लहान तुकड्यांमध्ये रूपांतर होते. यामुळे पोटातील पचन प्रक्रियेस मदत होते आणि अन्न पचणे सोपे होते. अन्न योग्य प्रकारे चघळल्याने त्यातील पोषकद्रव्ये चांगल्या प्रकारे शोषली जातात. परिणामी शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात. हळूहळू खाणं आणि जास्त चघळणं जलद पोट भरण्यास मदत करतं. यासोबत तुम्ही अन्न कमी प्रमाणात खाता आणि वजन नियंत्रित राहण्यास मदत होते. तसेच व्यवस्थित चावून खाल्याने आपल्या संभाषण कौशल्यासही मदत होते. चावताना तोंडाभोवती असलेल्या स्नायूंचा वापर करून जबड्याचा विकास होण्यास मदत होते. त्यामुळे आपण शब्द अधिक चांगल्या प्रकारे उच्चारण्यास सक्षम होतो.



**हेल्थ वेल्थ**

# फोटोचं लोकेशन जाणून घ्या

आपल्या स्मार्टफोनमध्ये बरेच फोटो असतात. यातले बरेच फोटो कधी आणि कुठे काढले आहेत हे आपल्याला आठवत नाही. पण स्मार्टफोनमधल्या एका सेटिंगमुळे तुम्हाला फोटोचं लोकेशन कळू शकतं. महाग असो वा स्वस्त, सर्वच स्मार्टफोन्समध्ये ही सोय असते. हे सेटिंग सुरू केलं की तुम्हाला फोटोच्या लोकेशनबद्दल सगळं काही कळू शकतं. हे सेटिंग ऑन करण्यासाठी काय करायला हवं हे पाहू या.



✻ स्मार्टफोनमधलं कॅमेरा ॲप ऑन करा. ✻ या ॲपच्या सेटिंग्जमध्ये जा. ✻ इथे तुम्हाला लोकेशन टॅग किंवा सेव्ह लोकेशन हा ऑप्शन दिसेल. त्यावर टॅप करून तो एनेबल करा. ✻ या सेटिंगमुळे तुमच्या स्मार्टफोनमधल्या फोटोंचं लोकेशन ऑन होईल. पण लोकेशन जाणून घेण्यासाठीही काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील. ✻ स्मार्टफोनमधलं डिफॉल्ट गॅलरी ॲप ओपन करा.

**मोबाईल वर्ल्ड**


✻ आता कोणतीही इमेज निवडा. ✻ आता उजवीकडे वरच्या बाजूला तीन टिंबं दिसतील. त्यावर टॅप करा. ✻ यानंतर इन्फो किंवा डिटेल्स हा ऑप्शन दिसेल. तो निवडा. ✻ इथे तुम्हाला फोटोचं लोकेशन कळेल. इतकंच नाही तर फोटोचा आकार, शटर स्पीड, आयएसओ ही माहितीही मिळू शकेल.

**ठिपके जुळवा**



# स्मरणशक्तीला शह देणारे 'ॲस्ट्रा'

तंत्रज्ञान क्षेत्रात जग बरंच पुढे जात असतानाच गुगल, ॲपलसारख्या कंपन्यांकडून नवनवीन तंत्रज्ञान आगळ्यावेगळ्या रुपात जगासमोर आणलं जात आहे. गुगलने एका मेगाइव्हेंटमध्ये 'प्रोजेक्ट ॲस्ट्रा (Project Astra)' हे फिचर लाँच केलं. गुगलच्या या नव्या प्रोजेक्टचा उपयोग भविष्यातील एआय असिस्टंट तयार करण्यासाठी केला जाईल.







गुगलचं हे नवं फिचर मोबाईल कॅमेरामध्ये दिसणाऱ्या प्रत्येक लहानमोठ्या गोष्टीची सविस्तर माहिती देणार आहे.

**टेक नॉलेज**

गुगलचं हे असिस्टंट टूल कॅमेरामध्ये दिसणाऱ्या सर्व गोष्टी लक्षात ठेवून भविष्यात गरज पडल्यास वापरताना दिसणार आहे. त्याचबरोबरीने तुमच्या आजुबाजूच्या परिसरासंदर्भातील माहिती देण्याचं कामही हे टूल करतं.

या टूलला तुम्ही कोणत्याही प्रकारचा प्रश्न विचारू शकता. तुम्ही एखादे चित्र रेखाटून ॲस्ट्राला त्याबद्दल माहिती विचारू शकता. हा असिस्टंट कोड वाचू शकतो आणि त्यांच्याबद्दल माहिती देऊ शकतो. असं हे कमाल फिचर सर्वसामान्य गुगल युजरपर्यंत येण्यासाठी काहीसा विलंब लागणार असला तरीही त्याचे काही फिचर्स 'गुगल जेमिनी' (Gemini) ॲपवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे फोटोमध्ये असणारी एखादी गोष्ट तुम्ही शोधताय किंवा अनावधानानं तुम्हाला ती दिसत नसेल तर गुगलचं हे टूल तुम्हाला त्याची माहितीही देणार आहे. थोडक्यात गुगलचे हे टूल म्हणजे तंत्रज्ञानाचा नवा टप्पाच आहे, असं म्हणणं गैर ठरणार नाही.




# असा करा चाचणीचा अभ्यास

शाळेत अचानक एखादी चाचणी जाहीर केली जाते. या चाचणीसाठी अभ्यास कसा करायचा, असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडतो. पण मित्रमैत्रिणींनो, काळजी करू नका. टेस्टसाठी अभ्यासाचं नियोजन कसं करायचं हे जाणून घ्या.

✻ अशा चाचण्यांसाठीचा अभ्यास वर्गातच सुरू करायला हवा. चाचणी जाहीर होण्याआधीपासूनच तुम्ही तयारीला लागायला हवं. वर्गात शिक्षक शिकवत असताना तुम्ही नोट्स काढता. या नोट्स नियमितपणे वाचायला हव्या. प्रत्येक विषयाच्या वेगळ्या नोट्स काढून घ्या. या नोट्सवर नजर टाकली तर तुमचा बराच अभ्यास होऊन जाईल. ✻ अभ्यासाला बसल्यावर कोणत्या विषयासाठी किती वेळ द्यायचा हे ठरवून घ्या. समजा, आज सोमवार आहे आणि शुक्रवारी तुमच्या तीन विषयांच्या टेस्ट आहेत. अशा वेळी कोणत्या विषयाला किती वेळ द्यायचा हे तुमचं तुम्हालाच ठरवायचं आहे. ✻ चाचणीच्या प्रकारानुसार अभ्यास करा. चाचणी कोणत्या प्रकारची आणि किती गुणांची असेल याबाबत शिक्षक माहिती देतात. त्यामुळे त्या पद्धतीने अभ्यासाचं नियोजन करा. ✻ तुम्ही मित्रमैत्रिणींचा गट करून अभ्यास करू शकता. यामुळे अडलेल्या गोष्टी एकमेकांना विचारता येतील. एकमेकांचं मार्गदर्शनही मिळेल. ✻ परीक्षेच्या आदल्या दिवशी काही गोष्टी आठवत नसल्या तरी काळजी करू नका. वाचलेलं लक्षात ठेवण्यासाठी मेंदूला थोडा वेळ द्यावा लागतो. रात्रीची शांत झोप घ्या. सकाळी बऱ्याच गोष्टी तुमच्या लक्षात असतील.



**स्टडी टिप्स**

**जिज्ञासा**


## ओळखा पाहू...

१) बुलंद दरवाजा ही वास्तू कुठल्या राज्यात आहे?
२) वाघांची संख्या दुप्पट करण्यात यशस्वी झालेला देश कोणता?
३) हिमा दास ही कोणत्या राज्याची पहिलीवाहिली क्रीडा ब्रँड अँबेसिडर बनली आहे?
४) आंतरराष्ट्रीय स्तरावर ३०० बळी घेणारी पहिली महिला गोलंदाज कोण?
५) 'द रूल ब्रेकर्स' या पुस्तकाच्या लेखकाचं नाव काय?
६) कोणता पुरस्कार आशियातला नोबेल पुरस्कार म्हणून ओळखला जातो?
७) सात बेटांचे शहर कोणते?
८) नीती आयोगाचे उपाध्यक्ष कोण?
९) अमेरिकेने हिरोशिमावर टाकलेल्या अणूबॉम्बचं नाव काय होतं?
१०) श्री रंगनाथस्वामी मंदिर कुठे आहे?

उत्तर : १) उत्तर प्रदेश २) नेपाळ ३) आसाम ४) झुलन गोस्वामी ५) प्रीती शेणॉय ६) रॅमन मॅगसेसे पुरस्कार ७) मुंबई ८) सुमन बेरी ९) लिटल बॉय १०) श्रीरंगम(तमिळनाडू)

# कसं पडलं 'ब्लॅक फॉरेस्ट' नाव?

मित्रांनो, आपल्या मित्रमैत्रिणींच्या वाढदिवसाला बऱ्याचदा ब्लॅक फॉरेस्ट केक आणलेला असतो. कारण आपल्या सगळ्यांनाच त्याची चव खूप आवडते. त्यामुळे वाढदिवसापासून ते सहजच केक खावासा वाटतोय असे म्हणणाऱ्यांची पसंती असते ती ब्लॅक फॉरेस्ट या फ्लेव्हरच्या केकला. मागील काही वर्षांमध्ये विविध चवींचे केक तयार करण्यात आले. पण, या साऱ्यांमध्ये ब्लॅक फॉरेस्ट मात्र आपली जागा टिकवून आहे असं म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही. ब्लॅक फॉरेस्ट केक म्हटलं की डार्क चॉकलेटचा केक असाच अनेकांचा समज असतो. पण, प्रत्यक्षात मात्र व्हाईट क्रिम, चेरी आणि चॉकलेट यांची सांगड घालून तयार करण्यात आलेला केक म्हणजे ब्लॅक फॉरेस्ट. जंगलाशी साधर्म्य असणाऱ्या या केकचं हे नाव कसं पडलं माहितीये? असं म्हटलं जातं, की या केकला पहिली ओळख १५०० च्या दशकामध्ये मिळाली होती. याच काळात युरोपमध्ये पहिल्यांदाच चॉकलेट तयार करण्यात आलं. असं म्हणतात की, त्या काळात हे चॉकलेट जर्मनीच्या ब्लॅक फॉरेस्ट येथे तयार करण्यात आलं होतं.



**गम्मत ग्यान**

**दोस्त हे मस्त**

## दाढीवालं गिधाड


दाढी असलेली गिधाडाची एक प्रजाती आहे. दक्षिण युरोपपासून भारतीय उपखंडातही हे पक्षी आढळतात. इतर गिधाडांप्रमाणे दाढीवाली गिधाडंही मेलेले प्राणी खातात. पण इतर गिधाडांच्या तुलनेत ही गिधाडं जिवंत प्राण्यांवर हल्ला करू शकतात.



**खादाडी**

## बटाट्याचे कुरकुरीत काप

छोट्यांनो, संध्याकाळच्या वेळी काही चटपटीत खावंसं वाटलं तर रवा आणि बटाट्याचे कुरकुरीत काप करता येतील. यासाठी एक कप रवा, उकडलेले सहा बटाटे, आठ हिरव्या मिरच्या, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबिर, तेल आणि चिमूटभर हिंग असं साहित्य घ्या. काप बनवण्यासाठी एका भांड्यात पाणी उकळून घ्या. पाणी उकळू लागलं की त्यात रवा घाला. मिश्रण हलवत रहा. रव्याच्या गाठी होणार नाहीत याची काळजी घ्या. यात थोडं मीठ घालून हलवत रहा. रवा नीट शिजू द्या. रवा शिजल्यावर थंड होऊद्या. आता एका मोठ्या भांड्यात उकडलेले बटाटे कुस्करून घ्या. त्यात कोथिंबिर, मिरची, हिंग आणि मीठ घाला. हे मिश्रण रव्यात घाला. आता कढईत तेल गरम करा. आता रवा आणि बटाट्याचं मिश्रणाचे गोळे बनवून त्यात सोडा. सोनेरी रंगाचे होईपर्यंत तळून घ्या. सॉससोबत खा.



**लाईफस्टाईल**

## जनुकांचा प्रभाव

लहान मुलांची शाळेतली कामगिरी त्यांच्या जनुकांवर अवलंबून असते. शाळेतल्या कामगिरीवर ७० टक्के जनुकांचा प्रभाव असतो. तर उरलेली ३० टक्के कामगिरी मेहनत आणि इतरांकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनावर अवलंबून असते. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. जनुकांमुळे मुलांच्या गुणांवरही परिणाम होतो. त्यामुळे काही मुलं खूप चांगले गुण मिळवतात तर काहींना कमी गुण मिळतात.



**योगा टाईम**

## उपयुक्त बकासन

बकासनामुळे आपले स्नायू बळकट होतात. या आसनामुळे शरीर आणि मन यात समतोल राखला जातो. बकासनात आपल्या शरीराचा सगळा भार हाताच्या पंजांवर टाकायचा असतो. यामुळे दंड, मनगट आणि खांद्यांच्या स्नायूंचा व्यायाम होतो.






**कान्स चित्रपट महोत्सव हा फ्रान्समधील कान्स या शहरात प्रतिवर्षी साजरा केला जातो. या महोत्सवाचा प्रारंभ १९३९ सालापासून झाला. जगातला हा एक महत्त्वाचा चित्रपट महोत्सव आहे. येथे चित्रपट दाखवला जातो हे सन्मानाचे व प्रतिष्ठेचे असते. कान्स महोत्सवात गोल्डन पाय (सोनेरी झळाळी) हा अतिशय महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे. भारतातील नामवंत दिग्दर्शक सत्यजीत रॉय यांना हा पुरस्कार ३० वर्षांपूर्वी मिळाला होता.**



# अभिनेत्री छाया कदम आणि कान्स चित्रपट महोत्सव

**शरद कोरडे**

कान्स महोत्सवात प्रत्यक्षात पुरस्कार देण्यास सन १९४६ सालापासून झाली. दरवर्षी मे महिन्यात दोन आठवडे हा महोत्सव कान्स येथे होतो. यात चित्रपट सादर करण्यासाठी व पुरस्कार देण्यासाठी तज्ज्ञांची एक निवड समिती स्थापन करण्यात आली आहे. जगभरातील अभिनेते, अभिनेत्री, तंत्रज्ञ व दिग्दर्शक यांच्यासाठी पुरस्कार मिळविणे हे प्रतिष्ठेचे मानले जाते. अधिकृत स्पर्धेसाठी निवडलेले चित्रपट हे जगातील प्रसिद्ध असलेले तज्ज्ञ असतात. ज्युरींसमोर प्रदर्शित केले जातात. त्यातून कसोटीला उतरलेले चित्रपट व दिग्दर्शक, कलाकार यांना पुरस्कार दिले जातात. यावर्षी २४ मे पासून हा महोत्सव सुरू झाला, त्यासाठी भारतातून चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व कलाकारांचा खुप मोठा समूह फ्रान्समध्ये गेला होता. यावर्षी होणारा हा महोत्सव ७७ वा आहे. मुळात हा महोत्सव फ्रान्समध्ये होण्याची कारणे मजेदार आहेत. इटालीमध्ये दरवर्षी व्हेनिस येथे चित्रपट महोत्सव होत असत. १९३६ सालच्या महोत्सवासाठी काही देशांचे प्रतिनिधी इटालीत गेले होते. त्यावेळी इटालीमध्ये बेनिटो मुसोलिनी व जर्मनीमध्ये अडॉल्फ हिटलरची सत्ता होती. या महोत्सवात अमेरिका व युरोपांतील काही देशही सहभागी झाले होते. त्यात सर्व निवड समितीने एकमताने अमेरिकन चित्रपटास पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु हिटलर व मुसोलिनी यांच्या अति दबावामुळे हे पुरस्कार जर्मनीचा दिग्दर्शक रिफेन स्टाइलच्या 'नाझी ऑलिम्पिया' या चित्रपटात व इटालीच्या लुझियानो यांच्या इटालियन चित्रपटास देण्यात आल्याने अमेरिका व फ्रान्सच्या प्रतिनिधींनी विरोध केला, पण त्याचा उपयोग झाला नाही. त्यामुळे फ्रेंच प्रतिनिधी फिलीप एर्लांगर यांनी पर्याय म्हणून फ्रेंच महोत्सव सुरू करण्याची योजना व त्याला अमेरिका व युरोपांतील देशांनी संमती दिली. त्यानंतर सर्वांनी एकत्र येऊन 'कान्स महोत्सव' फ्रान्समध्ये करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे भारतासह फ्रान्स, अमेरिका, व इतर आशियाई देशांनी १९३९ मध्ये या महोत्सवाची रचना केली, पण त्याचवेळी दुसरे महायुद्ध सुरू झाल्यामुळे हे कार्य थांबवण्यात आले. त्यानंतर युद्ध थांबल्यावर १९४६ साली हा 'कान्स चित्रपट महोत्सव' मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रसिद्ध अभिनेते कर्क डग्लस, सोफिया कॉरले, ग्रेस केली, कॅरी ग्रॅंट व इतर हॉलिवूडमधील मंडळी उपस्थित होती. जगातील १९ देशांनी या महोत्सवात भाग घेतला. तेव्हापासून या महोत्सवात स्पर्धक चित्रपट निर्मात्यांचे सिनेमांचे प्रिमियर व स्पेशल स्क्रिनींगचे आयोजन केले जाते. यावेळी मीडियासह सामान्य प्रेक्षकांनाही मर्यादित स्वरूपात प्रवेश दिला जातो. ज्या चित्रपटांचा प्रिमिअर आहे. त्या चित्रपटांतील कलाकारांना व दिग्दर्शकाला त्यापूर्वी रेड कार्पेटवर येण्याची व प्रेक्षकांशी संवाद साधण्याची संधी मिळते.

यावर्षी कान्स फेस्टिव्हलसाठी सुमारे २००० चित्रपटांच्या प्रवेशिका आल्या होत्या. त्यातील निवड समिती ५० चित्रपटांची निवड करते. शिवाय १० लघुपटांची निवड करण्यात येते. यावर्षीच्या महोत्सवात भारताने तीन पुरस्कारांवर आपले नाव नोंदविले. पायल कपाडिया यांच्या 'ऑल उईल इमॅजीन अज लाईट', पुण्यांतील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटचे स्नातक सदानंद नाईक यांचा 'सनफ्लॉवर वेअर द फस्ट वन टू नो' व अनुसया सेनगुप्ता यांचा 'शेमलेस' या तीन चित्रपटांनी सन्मानाचे व प्रतिष्ठेचे तीन पुरस्कार मिळविले.

'ऑल उर्दू इमॅजीन अन लाईट' या पायल कपाडिया यांच्या चित्रपटांमध्ये मुंबईत राहणाऱ्या तीन युवतींची आपापसातील मैत्री, प्रेमभाव, भगिनीभाव व तिघींच्याही आयुष्याचे वेगवेगळे पैलू, समस्या असल्या तरी त्या मैत्रीच्या धाग्यांनी एकमेकींना जोडलेल्या असतात. त्यातील प्रभा (कणी कुश्रुती) व अरू (दिव्यप्रभा) या दोघी नर्स असतात व एक खोलीत राहत असतात. त्यांची मैत्रीण असते पार्वती (छाया कदम) या तिघीही आपापल्या समस्येत गुंतल्या आहेत. प्रभा नवऱ्यापासून दुरावली आहे, तिला त्याच्याकडून अनपेक्षितरित्या भेट आली आहे. प्रभा आपल्या प्रियकरापुढे आपले मन उघड करू शकत नाही व त्यासाठी तिला एकांत मिळत नाही. यावर तोडगा म्हणून पार्वती या देखील घेऊन रात्री रस्त्यावर स्वैर भटकायला निघते आणि सर्वांच्या आयुष्यात अनपेक्षित घटना घडतात. या चित्रपटाच्या स्क्रिनींगपूर्वी या सर्व कलाकारांना रेड कार्पेटवर फिरण्याची संधी मिळते. नृत्यही करायला मिळते. थिएटरमध्ये चित्रपट संपल्यावर सर्व प्रेक्षकांनी उभे राहून आठ मिनिटे टाळ्या वाजवून त्यांना दाद दिली. अपेक्षेप्रमाणे या चित्रपटास ग्रँड प्रिक्स पुरस्कार जाहीर झाला. तीस वर्षानंतर हा पुरस्कार भारतीय सिनेमास मिळाला. यापूर्वी शाहजी एन. करूण यांच्या 'स्वाहम' या सिनेमाचं हा पुरस्कार मिळाला होता.

सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार यावर्षी अनुसया सेनगुप्ता यांना 'सेमलेस' या चित्रपटासाठी मिळाला. भारतीय अभिनेत्रीला मिळालेला हा पहिला पुरस्कार आहे. या तीनही पुरस्काराने भारतीय चित्रपटसृष्टीची मान उंचावली आहे. अनुसया सेनगुप्ता, कणी कुश्रुती, दिव्य प्रभा, छाया कदम यांच्या कामगिरीने भारतीयांना निश्चितच अभिमान वाटेल.

या फ्रेंच महोत्सवात गाजलेल्या अभिनेत्रींमध्ये मराठमोळ्या छाया कदमने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तीने नेसलेली साडी, त्यावरचा काळा कोट व नाकातील नथ यामुळे तिच्या लूकने सर्वांनाच अचंबीत केले. तिच्या चित्रपट सृष्टीतील आश्वासक कामगिरीचा आलेख उंचावर चाललेला आहे. छाया कदम यांनी आपल्या अभिनयाचा प्रवास नाट्य प्रशिक्षक वामन केंद्रे यांच्या नाट्यप्रशिक्षण वर्गापासून सुरू केला. केंद्रे सरांनी दिग्दर्शित केलेल्या 'झुलवा' या नाटकांतून त्या प्रथम रंगभूमीवर आल्या. पहिल्या नाटकानेच त्यांनी अभिनयात बाजी मारली. त्यानंतर 'अंगाई' हे नाटक त्यांनी केले. पण त्याचे प्रकार प्रयोग झाले नाहीत. दरम्यान छाया कदम यांनी साठे कॉलेजमधून आपले शिक्षणाची पदवी घेतली. यावेळी त्या कॉलेजमधील कबड्डी संघातून खेळत असत. कॉलेजच्या संघांतून त्यांनी राज्य पातळीवरही स्पर्धांत आपल्या संघाचे नेतृत्व केले. नंतर टेक्सटाईल डिझाईनमध्येही त्यांनी पदवी घेतली. नागराज मंजुळे यांच्या 'फॅन्ड्री' या मराठी चित्रपटांत २०१३ साली त्यांनी प्रथम काम केले. तसे पाहिले तर 'बाईसाहेब' हा अरूण नलावडे यांनी निर्मिती केलेला सिनेमा हा छाया कदम यांचा पहिला सिनेमा ठरला असता, पण हा सिनेमा प्रदर्शित झाला नाही. मात्र 'विठ्ठल' हा लघुपट २००९ साली प्रदर्शित झाला. मंजुळेंच्या 'फँड्री' मधील व 'सैसाट' मधील सुमन अक्काची भूमिका प्रेक्षकांना तुफान आवडली. हैद्राबादमधील आक्का परशा-अर्चिला गुंडांपासून वाचवते व त्यांना आपल्या घरी नेते. परशाला आपल्या डोशाच्या गाडीवर तर आर्चीला काचेच्या बाटल्यांच्या कारखान्यात नोकरीला लावते. तिच्या बेधडक रांगडेपणामुळे आर्चिला संरक्षण मिळते. सैराट नंतर छाया कदम यांना खूप प्रसिद्धी मिळाली व नवीन चित्रपटही मिळाले. २०१८ सालातील सागर वंजारी दिग्दर्शित कोकणच्या पार्श्वभूमीवरील 'रेडू' व रवि जाधव दिग्दर्शित 'न्यूड' या दोन्ही चित्रपटांतील आव्हानात्मक व धाडसी भूमिकांमुळे छाया कदम चर्चेत राहिल्या. त्यांना महाराष्ट्र सरकारचा सर्वश्रेष्ठ सहाय्यक भूमिकेचा पुरस्कारही मिळाला. त्यानंतर त्यांनी सरला एक कोटी, मी सिंधुताई सपकाळ, आटपाटी नाईट्स, सोयरीक, हलाल, केसरी, कोण प्रविण तांब? झेल्या, हेमराठी व 'अंधायुग', 'सिंघम रिटर्नस्' नागराज मंजुळे यांचा 'झुंड', संजय लिला भन्साळी यांच्या 'गंगूबाई काठियावाडी' आदी हिंदी चित्रपट केले. त्यांनी या अनेक चित्रपटांतून वेगळ्या बाजाच्या ऑफ बीट भूमिका धाडसीपणे केल्या. आता २०२४ च्या कान्स महोत्सवात गाजलेल्या पायल कपाडिया यांच्या 'ऑल उईल इमॅजीन अज लाईट' या हिंदी व मल्याळम चित्रपटाने तर त्यांच्या सिने कारकिर्दीला चार चाँद लावले. मुंबईत शिवाजी मंदिर येथे झालेल्या त्यांच्या सत्कारात त्यांना नाट्यप्रशिक्षक वामन केंद्रे व गौरी केंद्रे यांचे हातून गौरव होत असताना त्यांनी आपल्या गुरूंच्या हस्ते होणारा सन्मान स्विकारताना त्यांना गहिवरून आले. ज्यांनी मला प्रथम शिक्षण दिले, पहिले नाटक दिले त्यांच्याच हातून सत्कार स्विकारून मी कृतकृत्य झाले, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. ●●

# सुरांचा शहेनशहा किशोरकुमार

**१४ ऑक्टोबर १९८७ ची एक सकाळ नवाकाळ मध्ये सकाळीच हेडलाईन पाहिली. १३ ऑक्टोबर ला किशोर कुमारच्या हृदयविकाराने झालेल्या मृत्युची बातमी होती. सर्व वृत्तपत्रांची हेडलाईन एकच होती. अवघी सिनेसृष्टी हळहळली होती. गायनक्षेत्राच्या प्रसिद्धीच्या शिखरावर असलेला किशोर कुमार नावाचा तारा गळून पडला होता. गाणे, अभिनय, निर्देशक अशा सर्वच भुमिका तेवढ्याच ताकदीने पार पाडणारा अवलिया म्हणजे किशोर कुमार. आजही किशोर कुमार आपल्या गाण्यांच्या स्वरूपात अजरामर आहेत. त्यांना जाऊन ३७ वर्षे झाली. परंतू आजही त्यांच्या गाण्यांची क्रेझ तरूणांपासून सर्व वयोगटांतील लोकांमध्ये आहे. आजही तितक्याच आवडीने त्यांची गाणी ऐकली जातात.**

**श्रीराम शेटये**



४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेश मधील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांच खर नाव आभासकुमार गांगुली. प्रसिद्ध गायक के. एल.सहेगल यांच्यासारखं गाणं गायचं हे किशोर कुमारचं स्वप्न होते.

लहानपणी किशोर कुमार यांचा आवाज बेसूरा होता. मानवी जीवनात अनेक रहस्यमय घटना घडत असतात. किशोर कुमार यांच्या आयुष्यात अनेक रहस्यमय घटना घडलेल्या आहेत. लहाणपणी एक अपघात घडला त्यात भाजी कापायच्या विळ्यावर त्यांचा पाय कापला. डॉक्टरकडे गेल्यावर उपचार चालू करण्यात आले. पण पायाच्या वेदना थांबायचे नाव घेईनात. छोटा किशोर रात्रभर रडून रडून हैराण झाला.

परंतू एक चमत्कार घडला त्या रडण्याने त्याचा भेसुरा आवाज रडून रडून गळा साफ झाल्यामुळे आता चांगला झाला. आपसुकच गायनाची आवड होतीच. त्यात आवाज चांगला झाल्यामुळे त्याला आनंद झाला. किशोर कुमार यांनी गाण्याचे कोणतेही व्यावसाईक शिक्षण घेतले नव्हते.

लहाणपणी ते आपल्या मित्रपरिवार मध्ये खोडकरपणे गात असत. प्रत्येक गोष्ट गाण्यात बोलायची त्यांना सवय होती. त्या सवयीमुळे तेव्हापासूनच गायनाची आवड निर्माण झाली होती. मोठे बंधु अशोक कुमार हे नामांकित अभिनेते होते. एकदा प्रसिद्ध संगीतकार एस. डी. बर्मन अशोक कुमार यांना भेटायला घरी आले होते. बाथरूम मधून गाण्याचा आवाज येत होता.

एस डी म्हणाले '' कोण गात आहे'', अशोक कुमार म्हणाले.

माझा छोटा भाऊ गात आहे. आंघोळ होईपर्यंत गाणे चालूच राहिल. एस.डी. बर्मन ना तो आवाज आवडला. मग एस. डी. बर्मन यांनी अशोक कुमार यांना सांगितले याचा आवाज मला संगीतबद्ध करायचा आहे. खरंच किशोर कुमार यांची गुणवत्ता तर अप्रतिम होतीच. परंतू ते तितकेच भाग्यशाली देखील होते. एस. डी. बर्मन सारख्या महान संगीतकाराने घरात येऊन ऑफर देणे यापेक्षा मोठे सौभाग्य ते कोणते?

किशोर कुमार गाताना ते गाणे कोणावर चित्रित होणार आहे याचा विचार करून त्या अभिनेत्याच्या शैलीला सूट होईल असाच आवाज काढीत असत.

अमिताभ बच्चनसाठी त्यांचं गाणं एवढं जुळून येई की जणू अमिताभ स्वतःच गात आहे असा भास होई. आराधना चित्रपटाची गाणी किशोरकुमार यांच्या आवाजात गाण्यासाठी शक्ती सामंत आणि एस. डी. बर्मन दोघांचीही इच्छा होती. त्यांनी ही गोष्ट किशोर कुमार यांना सांगितली. तेव्हा किशोर कुमार म्हणाले, या चित्रफटाचा हिरो कोण आहे त्याची मी प्रथम मुलाखत घेईन आणि नंतरच त्याच्यासाठी गाणे गायचे की नाही ते ठरवतो. राजेश खन्ना नवोदित असताना राजेश खन्ना यांना आवाज देण्यापूर्वी प्रथम त्यांची मुलाखत किशोरदांनी घेतली. राजेश खन्ना यांना त्यांनी अनेक प्रश्न विचारून भंडाऊन सोडले. तु का अभिनय करीत आहेस? असे विचारले तेव्हा राजेश खन्ना म्हणाले, ''मला लोकांची सेवा करायची आहे.''

किशोर कुमार म्हणाले यात कसली सेवा आहे? राजेश खन्ना म्हणाले, ''लोकांचे मनोरंजन करून त्यांना आनंद देणे.''

हे उत्तर किशोरकुमार यांना आवडले त्यांनी राजेश खन्नासाठी आपल्या नोकराला बोलाऊन चहा व नास्ता मागवला. आराधना चित्रपटासाठी राजेश खन्ना यांना शोभणारे ''मेरे सपनोकी रानी कब आयेगी तू'' हे अजरामर गीत गायले. आराधनाची गाणी सुपरहीट झाली.

किशोरकुमार केवळ गायक नव्हते तर ते एक उत्तम अभिनेते देखील होते. चलती का नाम गाडी, झूमरू, पडोसन यासारख्या चित्रपटातून त्यांनी आपला अभिनय सिद्ध केला. महमुद सोबत त्यांच्या विनोदी पात्राच्या भुमिकाही अप्रतिम झाल्या. पडोसन मधील सुनील दत्त यांच्या सोबतची भुमिकाही यादगार आहे.

किशोर कुमार गायनासोबतच आपल्या सडेतोड आणि गंमतीशीर स्वभावासाठी प्रसिद्ध होते. एकदा एका निर्मात्याने त्यांना कामाचे अर्धेच पैसे दिले. तेव्हा चेहऱ्याच्या अर्ध्या भागाला मेकअप लाऊन किशोर कुमार स्टेजवर आले होते. तलवार नावाच्या एका निर्मात्याने त्यांच्या कामाचे पैसे थकविले होते. तेव्हा त्या निर्मात्याच्या घरासमोर जाऊन किशोर कुमार दररोज गाणे गात. त्या निर्मात्यांच्या घरासमोर जाऊन ,''हे तलवार दे दे मेरे आठ हजार'' असे म्हणत असत. शेवटी कंटाळून त्या निर्मात्याने पैसे दिले. किशोर कुमार यांच्या लोकप्रियतेएवढेच त्यांचे किस्सेही लोकप्रिय होते. घरात चाहत्यांची वर्दळ वाढू नये म्हणून लोकांना घाबरण्याकरीता लिव्हींग रूममध्ये मृत मानवी खोपडी व हाडांची प्रतिकृती लाऊन ठेवली होती. जेणेकरुन घरी गर्दी होऊ नये. किशोर कुमार यांची प्रेमप्रकरणे आणि वैवाहिक जीवन देखील रोमहर्षक आहे. किशोर कुमार आणि रूमा गुहा हे दोघेही बॉम्बे टॉकीज मध्ये एकत्र काम करीत होते. तेव्हा दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. दोघांनी १९५१ मध्ये लग्न केले परंतू दोनच वर्षात दोघे वेगळे झाले. कारण रूमा गुहा हिला बंगाली चित्रपटात काम करायचे होते परंतु किशोर यांना तिने घर सांभाळावं असे वाटायचे. रुमा गुहा पासून दुर झालेला किशोर कुमार 'चलती का नाम गाडी' चित्रपटाच्या दरम्यान मधुबालाच्या प्रेमात पडला. मधुबालाचे देखील 'दिलीप कुमार' बरोबर तुटलेल्या प्रेमामूळे मानसिक संतुलन बिघडलेले होते. त्यामुळे किशोर कुमारचा सहारा तिला मिळाला. दोघांनी कोर्ट मॅरेज केले. परंतू लग्नानंतर मधुबाला दोनच वर्षात आजारी पडली. आजार दूर्धर होता किशोर कुमार तिला उपचारासाठी लंडनला घेऊन गेला. परंतु हृदयाला छेद असल्याने काही उपचार चालेनात. किशोर हतबल झाला. तिच्या यातना त्याला पहावत नव्हत्या म्हणून तो तिच्यापासून चार-चार महिने दुर रहायचा. तिच्या सेवेसाठी डॉक्टर ठेवला होता. १९६९ मध्ये मधुबालाचा मृत्यु झाला. तिसरे लग्न योगिता बाली हिच्याशी १९७६ मध्ये झाला. परंतू दोनच वर्षात दोघे वेगळे झाले. योगिता बाली हिने मिथून चक्रवर्ती बरोबर लग्न केले. त्यानंतरही १९८० मध्ये लीना चंदावरकर नावाच्या गुणी व देखण्या अभिनेत्री सोबत किशोर कुमार यांनी लग्न केले. किशोर कुमार लिनापेक्षा वीस वर्षांनी मोठे होते. हे लग्न शेवटपर्यंत टिकले. किशोर कुमार आयुष्यभर गमतीजमती करीत राहिले. अगदी मृत्युच्या शेवटच्या दिवशी देखील त्यांनी लीना चंदावरकर यांना आपण मृत झालो आहोत असे नाटक करून गम्मत केली होती. श्वास रोखून धरला होता. पण दुर्दैवाने ही गंमत खरी ठरली. त्याच दिवशी किशोर कुमार यांचे हृदय विकाराने निधन झाले. ●●

# कान्हा खेळगडी!

**'कृष्णगान'**

**शशिकांत मुद्देबिहाळकर**

**९७६७१५२६०८**




या काव्यसंग्रहाच्या पहिल्या कवितेत आपण श्रीकृष्णाचे बालरूप पाहिले आहे. आता तो पौगंडावस्थेत आहे, म्हणजे थोडा मोठा झालाय अर्थात पोर सवदा म्हणा किंवा तारुण्याच्या उंबरठ्यावर आहे असे म्हणूया, कवी त्याला पाहून त्याचे खेळकर वर्णन फारच सुंदर करतो. कवी म्हणतो 'अरे कान्हा तूझे अविरतपणे खेळणे सुरू असताना तू वाटेत त्या सुंदर ललनांची छेड तर काढतोसच, पण त्यांच्यासाठी गोड फळे पण आणून देतोयस, ती धडपणे त्यांना खाऊनही देत नाहीस तर ती खेचून घेतोयस,

अशा खोड्या करू नकोस ना! अशी विनवणी त्यांनी करताच चावा घेऊन ती फळे उष्टी करून त्यांनाच परत देतोस अर्थात ती तूझी उष्टी फळेही त्यांना मधाळ, अविट गोड लागतात हे निराळेच. त्या ललना तक्रार करतात की आणखीन दिलेले नवनितादी पदार्थ, त्यांचा हात पोचत नाही अशा ठिकाणी उंचावर नेऊन ठेवतोस, तूझी स्तुती केल्यावर, आणि थोडीशी गंमत केल्यावर मग मात्र तू सुखावतोस, थोडा चिमटा काढला की सुंदर फुले आणून देतोस, तुझ्या या खोड्यांनी त्या नारींच्या डोळ्यातील अश्रू पाहून, त्यांना डोळे मिटायला सांगतोस, ती सुंदर फुले त्यांच्या केशी माळीन असे म्हणतोस आणि त्यांनी डोळे मिटून घेतले की त्याच क्षणी तू ती फुले दुसऱ्याच सखीच्या केशी माळतोस, ती माळली न माळली की मागे जाऊन माळलेली वेणी खेचतोस, कुणी वेणी खेचली हे पहायला मागे वळावे तर लबाडा! लगेच पळून जातोस आणि लपून बसतोस तो तू शोधूनही सापडत नाहीस, नवी कोरी साडी उडवून धुळीत मळवून टाकतोस.

पावा हाती घेऊन मधूर स्वरांचा वर्षाव करतोस, आणि त्या मधूर स्वरांनी धुंद होऊन डोळे निमिषार्धात मिटतात, डोळे मिटले की तोंडे उघडी पाहून त्यात किटक टाकतोस अशा तुझ्या खोड्यांनी त्या ललना त्रस्त होतात. किती वर्णावा तुझ्या अंगच्या खोड्यांचा त्रास! असेकवीम्हणतो. एवढे होऊन थांबते तर तू कान्हा कसला! त्या त्रस्त ललनांना, आता आपण खेळूया असे म्हणतोस. घरात कामांचा ढीग पडलाय असे त्या ललना तूला विनवणी करून सांगतात तर त्यांच्या हातास धरून खेचून त्यांना खेळायला घेऊन जातोस, त्या खेळात दंग होऊन जातात तर हळूच त्यांना नकळत त्यांच्या घरी जाऊन तेथे त्या ललनांविषयी चहाड्या करीत बसतोस. असा खोडकर तू तुझ्या आईचा मात्र गुणी बाळ असतोस, बाबा, आत्या, यांचाही गुणी बाळ असतोस. इकडे आम्हाला छळतोस आणि घरात वडिलांबरोबर मात्र चांगला नम्र असतोस. गोष्टी रचण्यात पक्का समर्थ आहेस, तूला खोटे बोलण्याचेही भय नाही, एकाशी एक आणि दुसऱ्याशी दुसरे बोलतोस, खरंच तू खरा तर, खलनायक आहेस असे कवी म्हणतो. अखेरीस कवी कृष्णाला म्हणतो खोड्या काढून किती त्रास देतोस तरी किती नारींवर तू प्रेम करतोस, त्यांचेही प्रेम मिळवतोस, की तुझ्या वियोगाने मात्र त्या व्यथित होतात. ●●

**(कवि. प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)